

लोकसभेचा संग्राम

दैनिक

# महाराष्ट्र सम्राट

सम्राट अनेक परंतु बातम्यांचा एकच ! ®

मुंबई, मुंबई उपनगर, ठाणे, नवी मुंबई, रायगड, पालघर आणि पुणे येथून प्रसिद्ध

संपादक : चंद्रकांत भोईटे





**तापमान**

कमाल ४१° से | किमान २८° से

**बाजार**

सोने ७१,०७० | चांदी ८१,८६०

**डोकं खाजवा** -अशोक सुतार



मी त्या पक्षातून का उभा राहिलो ? अन्यथा मी आता तुरुंगात गेलो असतो.

# विधानपरिषद निवडणुकीसाठी बिगुल वाजल




## लोकसभा निकाल लागताच महाराष्ट्रात पुन्हा रणधुमाळी

**मुंबई – राज्यात लोकसभेची रणधुमाळी संपते न संपते तोच विधानपरिषदेच्या चार जागांवर निवडणूक होत आहे. पदवीधर आणि शिक्षक मतदारसंघाच्या निवडणुका जाहीर झाल्या आहेत. मुंबई, नाशिक आणि कोकण विभागाचं १० जूनला मतदान होतंय. मुंबई आणि कोकण पदवीधर तसंच मुंबई, नाशिक शिक्षक मतदारसंघाची निवडणूक जाहीर झालीय. चार आमदारांचा कार्यकाळ ७ जुलैला संपतोय.**

विधानपरिषदेच्या पदवीधर आणि शिक्षक मतदारसंघातील चार जागांसाठी १० जूनला मतदान होणार आहे. विधान परिषद सदस्यांच्या एकूण सदस्यांपैकी ७ सदस्य शिक्षक, तर ७ सदस्य पदवीधर मतदार संघातून निवडून जातात. दरम्यान दोन पदवीधर आणि दोन शिक्षक मतदार संघातील रिक्त होणाऱ्या एकूण चार जागांसाठी निवडणूक आयोगाने निवडणूक कार्यक्रम जाहीर केला. या कार्यक्रमानुसार १० जूनला मतदान होणार असून १३जूनला मतमोजणी होईल.



कपिल हरिश्चंद्र पाटील (लोकभारती)



किशोर भिकाजी दराडे नाशिक शिक्षक (ठाकरे गट)



निरंजन वसंत डावखरे कोकण पदवीधर (भाजप)



विलास विनायक पोतनीस मुंबई पदवीधर (ठाकरे गट)



## या चार आमदारांचा कार्यकाळ ७ जुलैला संपणार ?

**मुंबई आणि कोकण पदवीधर तसंच मुंबई, नाशिक शिक्षक मतदारसंघाची निवडणूक जाहीर झालीय. चार आमदारांचा कार्यकाळ ७ जुलैला संपतोय.**

### कशी असणार निवडणूक प्रक्रिया ?

निवडणुकीची प्रक्रिया १५ मे पासून सुरू होणर आहे. इच्छुक उमेदवारांनी २२ मे पर्यंत अर्ज दाखल करता येणार आहे. इच्छुकांनी दाखल केलेल्या अर्जाची छाननी २४ मे रोजी होणार तर आहे. अर्ज मागे घ्यायचा असेल २७ मे पर्यंत उमेदवारांना अर्ज मगे घेता येणार आहे.

पदवीधर मतदार संघातील उमदेवाराला नोंदणी आवश्यक असते. मतदार संघात हजर राहून मतदान करावे लागते. निवडणूक जाहीर होण्याच्या तीन वर्षाआधी मतदाराने आपला पदवी अभ्यासक्रम पूर्ण केलेला असावा.

### कशी पार पडते निवडणूक प्रक्रिया ?

विधानपरिषद निवडणुकीत सर्वात मोठा मुद्दा गुप्त मतदानाचा आहे. राज्यसभेत खुले मतदान असल्याने पक्षाच्या आमदारांना मत दाखवून टाकावे लागते. पण विधान परिषद आमदार गुप्त मतदान करतात त्यामुळेच विधान परिषद निवडणुकीत मोठ्या प्रमाणावर क्रॉस वोटिंग होण्याची शक्यता असते. निवडणुकीसाठी जितके मतदार उभे असतील तेवढ्या उमेदवार ना पसंती क्रम देता येतो. विधान परिषद सदस्यांचा कार्यकाळ सहा वर्षांचा असतो. विधान परिषद स्थायी सभागृह आहे. ते कधीही विसर्जित होत नाही. दर दोन वर्षांनी सभागृहाचे एकास तीन सदस्य निवृत्त होतात तेवढेच नव्याने निवडतात.

**थोडक्यात घडामोडी**

## गुरूवारी दिवा आणि मुंब्रा प्रभागातील काही क्षेत्रात आठ तास पाणी बंद राहणार

ठाणे – दिवा प्रभाग क्षेत्रात शीळ, खर्डी आणि भोलेनाथ नगर तसेच, मुंब्रा प्रभाग क्षेत्रातील वाय जंक्शनपासून मुंब्रा अग्निशमन केंद्रापर्यंतच्या भागात गुरूवार, ०९ मे रोजी स. १० ते सायं. ६ या आठ तासात पाणी पुरवठा बंद राहणार आहे. एमआयडीसीच्या मुख्य जलवाहिनीवर भोलेनाथ नगर गेट समोरील नाल्यातील ६६० मीमी व्यासाच्या जलवाहिनीवरील

### अनधिकृत नळ जोडणी खंडित करणे आणि व्हॉल्व्ह दुरुस्तीची कामे होणार

अनधिकृत नळ संयोजन खंडित करणे आणि कल्याण फाटा जलकुंभाकडे जाणाऱ्या जलवाहिनीवरील ३५० मी मी व्यासाच्या व्हॉल्व्हची दुरुस्ती करणे या कामांसाठी गुरूवार, ०९ मे रोजी स. १० ते सायं. ६ या आठ तासात पाणी पुरवठा बंद राहणार आहे. कल्याण फाटा येथून एमआयडीसीच्या जलवाहिनीवरून होणारा पाणी पुरवठा या काळात खंडित राहणार आहे. दुरुस्तीचे काम झाल्यानंतर पुढील दोन दिवस या भागात कमी दाबाने पाणी पुरवठा होईल. त्यामुळे नागरिकांनी आवश्यक पाणी साठा करून ठेवावा, तसेच, पाण्याचा अपव्यय टाळून महापालिकेस सहकार्य करावे, असे आवाहन प्रशासनातर्फे करण्यात आले आहे.

(छाया – मनोज सिंह)



ठाण्यातील उथळसर येथील बाबुभाई पेट्रोल पंप समोरील रस्त्यावर ड्रेनेजचे झाकण धसल्याने मोठे खड्डे पडले आहेत याठिकाणी अपघात होऊन नये म्हणून स्थानिक नागरिकांनी खड्ड्याभोवती रेखाटण्यात आले आहे.

## मतदानाच्या जागृतीसाठी ठाण्यात शनिवारी मिनी मॅरेथॉन

ठाणे – येत्या २० मे रोजी होऊ घातलेल्या लोकसभा निवडणुकीत जास्तीत जास्त मतदारांनी मतदान करावे याबद्दल जागृती करण्यासाठी ठाण्यात, शनिवार, ११ मे रोजी सकाळी मिनी मॅरेथॉनचे आयोजन करण्यात आले आहे. ठाणे महापालिका, जिल्हाधिकारी कार्यालय, ठाणे जिल्हा ॲथलेटिक असोसिएशन आणि ठाणे सिटीझन्स फाऊंडेशन यांचा हा संयुक्त उपक्रम असून जास्तीत जास्त धावपटूंनी या मॅरेथॉनमध्ये सहभागी व्हावे, असे आवाहन ठाणे महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी केले आहे. सार्वत्रिक निवडणुकीत मतदानाची टक्केवारी वाढावी यासाठी ठाणे महापालिकेतर्फे 'स्वीप' अंतर्गत विविध उपक्रम हाती घेतले आहेत. रविवारला जोडून मतदानाची सुटी आली असली तरी नागरिकांनी मतदान करणे चूकवू नये यासाठी वारंवार जागृती केली जात आहे. या मतदानाची आठवण करून देण्यासाठी 'धावा आणि मतदान करा' असा संदेश देणारी मिनी मॅरेथॉन **(पान २ वर)**

# छत्रपती संभाजीनगर आणि धाराशिव नामांतरावर शिक्कामोर्तब, शिंदे सरकारला दिलासा!

**मुंबई : नामांतराच्या वादावर सरकारला मोठा दिलासा मिळाला आहे. औरंगाबाद – उस्मानाबाद नामांतर वादावर आज हायकोर्टाने फैसला दिला आहे. केंद्र सरकार आणि राज्य सरकारच्या निर्णयाला स्थानिक रहिवाश्यांकडून दिलेलं आव्हान हायकोर्टाने फेटाळलं आहे. मुंबई उच्च न्यायालयानं ऑक्टोबरमध्ये राखून ठेवला निर्णय आज जाहीर केला आहे.**

४ ऑक्टोबर २०२३ रोजी यावर सुनावणी पूर्ण करत मुख्य न्यायमूर्ती देवेंद्रकुमार उपाध्याय आणि न्यायमूर्ती आरीफ डॉक्टर यांच्या खंडपीठाने आपला अंतिम निकाल राखून ठेवला होता. तो निकाल आज जाहीर केला आहे. तो निकाल जाहीर करताना राज्य सरकारने महसूल विभागाच्या अंतर्गत येणाऱ्या भागात उस्मानाबाद आणि औरंगाबाद यांचे अनुक्रमे धाराशिव आणि छत्रपती संभाजीनगर नामकरण करण्याचा निर्णय अतिशय योग्य आहे. या निर्णयामुळे कोणालाही फरक पडणार नाही, असा निकाल देत स्थानिकांनी केलेल्या याचिका फेटाळल्या आहे. या याचिका फेटाळताना हायकोर्टाने कोणताही आर्थिक दंड लावू इच्छित नाही, असे स्पष्ट केले आहे.




नामांतराचा निर्णय राज्य सरकारने अतिशय प्रतिष्ठेचा केला होता. आगामी निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर केवळ ही दोन शहरे नव्हे तर अन्य शहरांचा नामांतर करण्याचा प्रस्ताव विचारधीन असल्याचे स्पष्ट केले आहे. नुकतेच राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सुद्धा अहमदनगर अहिल्यानगर होईल असे स्पष्ट केले आहे.

### सुप्रीम कोर्टात जाणार : याचिकाकर्त्यांचे वकील

याचिकाकर्त्यांचे वकील म्हणाले. महिनाभर सुनावणी झाल्यानंतर कोर्ट आमच्या बाजूने निकाल लावेल अशी अपेक्षा होता. आज हायकोर्टाने दिलेला निकाल आम्हाला अपेक्षीत नव्हता. याचिकाकर्ते बॉम्बे हायकोर्टाच्या निकालाविरोधात सुप्रीम कोर्टात जाणार आहेत. १९९८ साली सुप्रीम कोर्टाने जो याचिकाकर्त्यांना दिलासा दिला होता तशाच प्रकारचा न्याय निकाल सुप्रीम कोर्टातून आम्हाला मिळेल अशी आशा आहे.

### निवडणुकांच्या काळात याचिका फेटाळणे चुकीचे : याचिकाकर्ते

हायकोर्टाने दिलेला निकाल हा राजकीय हेतूने आलेला आहे. सध्या महाराष्ट्रात निवडणुका आहेत. निवडणुकांच्या काळात याचिका फेटाळण्यात आली आहे. निवडणुकांच्या काळात याचिका फेटाळणे चुकीचे आहे. आम्ही सुप्रीम कोर्टाच जाणार, असे याचिकाकर्ते म्हटले आहे. यासंदर्भात आलेल्या २८ हजार आक्षेप अर्जांचा विचार करण्यात आलेला नाही. तसेच निव्वळ राजकिय हेतूनंच हा निर्णय घेण्यात आलाय.

## १४२– कल्याण पूर्व मतदारसंघातील विविध चाळी व सोसायट्यांमध्ये गृहभेटीद्वारे मतदान जनजागृती

ठाणे – लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ अंतर्गत २४– कल्याण लोकसभा मतदारसंघातील स्वीप पथकाने १४२ कल्याण पूर्व विधानसभा मतदार संघातील विविध चाळी व सोसायट्यांमध्ये मतदान जनजागृती केली व नागरिकांना येत्या २० मे रोजी मतदान करण्याचे आवाहन केले.

१४२ कल्याण पूर्व विधानसभा मतदारसंघात सहा. निवडणूक निर्णय अधिकारी गोपीनाथ ठोंबरे आणि अति. सहा. निवडणूक निर्णय अधिकारी डॉ. स्वाती घोंगडे यांच्या मार्गदर्शनाखाली आज स्वीप पथकातील (मतदार जनजागृती पथक) महापालिकेचे शिक्षणाधिकारी



तथा नोडल अधिकारी विजय सरकटे (स्वीप) यांच्या अधिपत्याखालील पथकाने ही गृहभेटीद्वारे जनजागृती कार्यक्रम पार पाडला. यावेळी या पथकांनी कैलास नगर, शंकर पावशे रोड, काटेमानेवाली परिसरातील मॉर्डन गृहनिर्माण सोसायटी, ज्ञानदिप गृहनिर्माण सोसायटी, जय अंबे कॉलनी, **(पान २ वर)**

पालिकेने घेतली उष्म्याची दखल...

## २५ ठिकाणी तात्पुरत्या पाणपोई सुरु

ठाणे – यंदा ४२ पार तापमानाचा आणि अति उष्म्याचा सामना ठाणेकरांना करावा लागला. या तापमानाची दाखल ठाणे पालिके घेत ठाण्यात तात्पुरत्या २५ ठिकाणी पाणपोई उभारण्याची मोहीम सुरु करण्यात आलेली आहे. तर पालिकेच्या या उपक्रमात एमएचसीआय आणि समर्थ भारत व्यासपीठ यांच्या सहकार्याने सुरु करण्यात आलेली आहे.

नागरीकरणामुळे शहरात वाढत जाणाऱ्या उष्णतेमुळे निर्माण होणाऱ्या संकटावरील नियंत्रणासाठी ठाण्याचा सर्वंकष उष्णता उपाययोजना आराखडा तयार करण्यात आला आहे. महाराष्ट्र शासन, ठाणे महानगरपालिका व काऊन्सिल ऑफ ऍनर्जी एनव्हायरोमेंट ॲण्ड वॉटर या संस्थांनी हा आराखडा एकत्रितपणे तयार केलेला आहे. उष्णतेच्या लाटेच्या सामना करण्यासाठी ठाणे महानगरपालिका सजग असून परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन आयुक्त सौरभ राव यांच्या आदेशानुसार महापालिका क्षेत्रात मोठ्या प्रमाणात जनजागृतीही करण्यात येत आहे. आयुक्त सौरभ राव यांनी दिलेल्या निर्देशानुसार महापालिका क्षेत्रात पाणपोई सुरू करण्यात आल्या आहेत. ठाणे महापालिकेने केलेल्या आवाहनानुसार, सीएसआरच्या माध्यमातून पाणपोई सुविधा उपलब्ध केली गेली आहे. या २५ ठिकाणी पाण्याचे मोठे माठ, ग्लास ठेवण्यात आले आहेत. तेथे दररोज पिण्याचे शुद्ध पाणी भरण्याची व्यवस्था संबंधित संस्था करत आहेत, माहिती मुख्य पर्यावरण अधिकारी मनिषा प्रधान यांनी दिली.

ठाणे स्टेशन, कोपरी पूल, आईस फॅक्टरी, जवाहरबाग, आशर आयटी पार्क, किसननगर शाळा, अंबिका




नगर नं. ३, पडवळ नगर, हाजुरी गाव, पासपोर्ट ऑफिस, तीन हात नाका, कोलशेत रोड नाका, बाळकूम नाका, माजीवडा नाका, कळवा स्टेशन, ९० फूट रस्ता–खारेगाव, कळवा नाका–दत्त मंदिर, कौसा तलाव, वफा पार्क, अमृत नगर, लोकमान्य डेपो, राबोडी, कोर्ट नाका, वर्तकनगर नाका, शास्त्री नगर नाका अशा २५ ठिकाणी पाणपोई सुरू करण्यात आली आहे.

# ठाण्यात आगरी कोळी मतांच्या ध्रुवीकरणाची ठाकरे सेनेची रणनीती

ठाणे : नवी मुंबई विमानतळाला दि.बा. पाटील यांचे नाव देण्याचा प्रलंबित प्रस्ताव याच भागातील प्रकल्पग्रस्तांची घरे नियमित करण्यात निर्माण झालेली अडसर आणि संजीव नाईक यांची उमेदवारी डावलली गेल्याने आगरी, कोळी, प्रकल्पग्रस्त समाजात असलेली नाराजी गृहीत धरून शिवसेना उद्धव ठाकरे गटाने ठाण्यात या समाजाच्या ध्रुवीकरणाचे पद्धशीर प्रयत्न सुरू केल्याचे चित्र आहे.

नवी मुंबईत घेतलेल्या मेळाव्यात राजन विचारे यांनी नवी मुंबई विमानतळाच्या नामांतराचा प्रश्न हाती घेतला. याशिवाय, अटकेत असलेले आगरी समाजाचे पदाधिकारी एम.के. मढवी यांच्या अटकेचा मुद्दाही स्वत: उद्धव ठाकरे आणि विचारे या दोघांनीही तापविण्याचा प्रयत्न केला. मिरा भाईंदरमधील कोळी समाजाचे प्रश्न तसेच ठाणे, बाळकूम भागातील आगरी समाजाला चुचकारण्यासाठी देवराम भोईर आणि संजय भोईर यांच्यावर झालेल्या कथित राजकीय अन्यायाच्या चर्चाही उद्धव सेनेकडून पद्धशीरपणे घडविली जात आहे. या मतदारसंघात असलेल्या दोन लाखाहून अधिक आगरी, कोळी समाजातील मतांची रसद पक्षामागे उभी करण्यासाठी काही विशिष्ट पदाधिकाऱ्यांच्या नियुक्त्याही केल्या जात असल्याचे समजते.



ठाणे लोकसभा मतदारसंघाचा कोंडवळा गेल्या काही वर्षांमध्ये झपाट्याने बदलला असला तरी या भागात असलेल्या आगरी कोळी समाजाचे मतदान नेहमी वैशिष्ठपूर्ण राहिले आहे. १२ वर्षांहून अधिक काळ ठाणे जिल्ह्याचे पालकमंत्री पद भूषविलेले गणेश नाईक हे आगरी समाजाचे मातब्बर नेते मानले जातात. ठाण्याचा बदललेला सामाजिक चेहरा नाईक यांनी राजकीय नेता म्हणून पूरेपूर लक्षात घेतला. त्यामुळे आगरी समाजाचे मोठे पाठबळ असतानाही नाईक यांनी स्वत:ची प्रतिमा बहुभाषिक समाजाचा नेता म्हणून उभी केली. या दुहेरी समीकरणाचा राजकीय फायदा अनेक दशक नाईक यांना झाला. २००९ मध्ये नव्याने निर्माण झालेल्या ठाणे लोकसभा मतदार संघात संजीव नाईक हे खासदार म्हणून निवडून आले. त्यावेळी शिवसेनेचे उमेदवार विजय चौघुले यांचा पराभव करताना नाईक यांना एकगठ्ठा आगरी, कोळी समाजाच्या मतदानाची रसद उपयोगी ठरली. नवी मुंबई महापालिका हद्दीत २९ गावांमधून अजूनही आगरी, कोळी समाजाचे मोठे मतदान आहे. ठाण्यातील बाळकूम, कोलशेत, ढोकाळी, वाघबीळ, ओवळा, कासारवडवली याशिवाय मिरा भाईंदर भागातील उत्तन तसेच आस–पासच्या परिसरात अजूनही मोठ्याप्रमाणावर आगरी कोळी समाजाची वस्ती आहे. उत्तन भागात एक मोठा समाज मासेमारीवर अवलंबून असून या भागात जेट्टी उभारणे, मासेमारीसाठी पेट्रोल दिवे उभे करून देणे अशी काही कामे विचारे यांनी ठरवून गेल्या १० वर्षांत केली आहे. संजीव नाईक यांना उमेदवारी मिळाली नसल्याने आगरी कोळी मते कोणाकडे वळतात याविषयी कमालीची उत्सुकता असून याच मतांच्या ध्रुवीकरणाचा प्रयत्न उद्धव सेनेने सुरू केला आहे.

# संपादकीय...



संपादक-चंद्रकांत भोईटे

## मोदींची बेताल बडबड

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी राहुल गांधींवर एक राजकीय डाव टाकला आहे. त्यांनी नुकतेच राहुल गांधी आणि काँग्रेस पक्षावर जोरदार टीका केली. पंतप्रधान मोदी म्हणाले, काँग्रेस पक्षाने अदाणी आणि अंबानी यांच्याकडून मोठ्या प्रमाणात काळा पैसा गोळा केला असून हे पैसे घेतल्यानंतर काँग्रेसने त्यांच्यावर टीका करणे बंद केले आहे. लोकसभा निवडणुकीच्या प्रचारासाठी पंतप्रधान मोदी तेलंगणा आणि आंध्र प्रदेश राज्याचा दौरा करत आहेत. एका प्रचार सभेत बोलताना ते म्हणाले, तुम्ही मागचे पाच वर्ष पाहिले असेल की, काँग्रेसचे राजकुमार अदाणी आणि अंबानी यांच्या नावाचा जयघोष करत होते. मात्र निवडणूक जाहीर होताच अचानक त्यांनी अदाणी आणि अंबानी यांच्याविरोधात बोलणे बंद केले आहे. दोन्ही उद्योगपतींकडून त्यांना किती बॅगा भरून काळा पैसा मिळाला? अदाणी-अंबानी आणि राहुल गांधी यांच्यात अशी कोणती डील झाली? ज्यामुळे आता एका रात्रीत राहुल गांधी यांचा दृष्टीकोन बदलला, असे मोदी यांनी म्हटले आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी राहुल गांधीवर अदानी, अंबानीकडून पैसे घेतल्याचा आरोप केला आहे. आता या आरोपावरून राष्ट्रीय तपास यंत्रणा राहुल गांधी यांना अटक करणार काय असा प्रश्न उपस्थित होत आहे. जरी नरेंद्र मोदी खोटे बोलत असले तरीही केंद्र सरकार किंवा राष्ट्रीय तपास यंत्रणा राहुल गांधी यांच्यावर कारवाई करू शकते, अशी भीती व्यक्त होत आहे. कारण आत्तापर्यंत फक्त संशयावरून अनेक राजकीय नेत्यांना अटक झाली आहे आणि अनेक राजकीय नेते अटक झाल्यानंतर काही महिने तुरुंगात आहेत. राहुल गांधींच्या आरोपांना उत्तर देत असताना पंतप्रधान मोदींनी पहिल्यांदाच उद्योगपती अदाणी-अंबानी यांचे नाव घेतले आहे. भाजपा आणि पंतप्रधान मोदी हे उद्योगपतीधार्जिणे निर्णय घेत आहेत. शेतकऱ्यांवर मोठ्या प्रमाणात कर्ज लादून भांडवलदारांना कोट्यवधींची कर्जमाफी दिली, असा आरोप काँग्रेसकडून वारंवार केला जात होता. राहुल गांधी यांच्यावर अदानी, अंबानीकडून पैसे घेतल्याचा आरोप पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केला आहे. तो आरोप खोटा वाटतो. कारण पंतप्रधान नरेंद्र मोदी हे उद्योगपतीधार्जिणे आहेत. तसेच नरेंद्र मोदी केंद्रात सत्तेवर आल्यानंतर अदानी आणि अंबानी यांना बरेचसे देशातील कंत्राट मिळाले आहे. ते विनाकारण राहुल गांधी यांना खोट्या आरोपाखाली अटक करतील असे वाटते. त्यामुळे हा प्रकार वाटतो तितका सोपा नाही, तर गंभीर आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या टीकेला उत्तर देत असताना काँग्रेस नेत्या प्रियांका गांधी वाड्रा यांनी म्हटले आहे की, राहुल गांधी यांनी अदाणी - अंबानी यांचे नाव घेतले नसले तरी ते रोज उद्योगपतींबद्दल बोलत आहेत. त्यांचे सत्य लोकांसमोर मांडण्याचा प्रयत्न राहुल गांधी करत आहेत. भाजपा आणि बड्या उद्योगपतींचे साटेलोटे असल्याचे आम्ही लवकरच उजेडात आणत आहोत. पंतप्रधान मोदींनी आपल्या मित्रांचे म्हणजे उद्योगापतींचे १६ लाख कोटींचे कर्ज माफ केले आहे. दुसरीकडे उत्तर प्रदेशमध्ये मोठ्या प्रमाणावर शेतकरी आत्महत्या करत आहेत. मात्र त्यांची कर्जमाफी केली जात नाही, असा आरोप प्रियांका गांधी यांनी केला आहे.

राहुल गांधी यांच्यावर नरेंद्र मोदींनी उद्योगपतींकडून पैसे घेतल्याचा आरोप करणे, हास्यास्पद वाटते. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना आता असे जाणवत आहे की, देशातील बहुतांश जनता भाजपच्या पाठीशी नाही, या नाराजीतून मोदी बेताल वक्तव्य करत आहेत असे वाटते. जेव्हा एखादा माणूस निराश होतो, त्यावेळी तो बेताल बडबड करतो. त्याचप्रमाणे पंतप्रधान मोदी हे बेताल बडबड करत असल्याचे दिसते. परंतु जनता त्यांचा आरोप गांभीर्याने घेणार नाही असेही वाटते. सध्या एकमेकांवर आरोप करण्याची स्पर्धा लागली आहे. या स्पर्धेमध्ये अनेक नेत्यांवर बेताल आरोप केले जातात. दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांच्यावर मद्य घोटाळ्याचा कथित आरोप करून त्यांना सध्या तुरुंगात ठेवले आहे. ते सध्या तुरुंगात आहेत, मात्र लोकसभा निवडणुकीत आम आदमी पार्टीचे नेतृत्व बाकीचे आमदार करीत आहेत. अरविंद केजरीवाल यांना निवडणूक काळात ठेवणे म्हणजे आम आदमी पार्टीला कमी मते मिळावी असा उद्देश भाजपाचा दिसतो. अरविंद केजरीवाल खरोखरच मद्य घोटाळ्यात असते तर त्यांना त्वरित अटक झाली असती. परंतु केंद्रीय तपास यंत्रणेकडे सध्या कोणताही पुरावा नाही. केंद्र सरकारच्या इशाऱ्यावर चालतात. त्यामुळे देशात विरोधकावर फक्त संशयावरून तुरुंगात टाकण्याचे प्रमाण वाढले आहे. देशात ही नवीन पद्धत सुरू झाली आहे. त्यामुळे देशात खरोखरच लोकशाही आहे काय असा प्रश्न उद्भवतो.

तेलंगणा आणि आंध्र प्रदेशमध्ये लोकसभा निवडणुकीदरम्यान राहुल गांधी यांना तेथील जनतेचे मोठे समर्थन मिळत आहे. हे समर्थन पाहून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना निराशा आली असे वाटते. कारण ते राहुल गांधी यांच्यावर बेताल आरोप करत आहेत. विशेष म्हणजे राहुल गांधी गेल्या काही वर्षांत अंबानी आणि आदानी यांच्यावर टीका करत असलेले दिसतात. त्याचवेळी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अदानी आणि अंबानी यांना देशातील रेल्वे, विमानतळ आणि बऱ्याच क्षेत्रातील कंत्राट दिले आहे. केंद्र सरकार उद्योगपतींना धार्जिणे निर्णय घेत असल्याचे दिसते. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर उद्योगपती धार्जिणे असल्याची टीका होते. परंतु आपल्यावर होणारी टीका पंतप्रधान नरेंद्र मोदींनी राहुल गांधी यांच्यावर केलेली दिसते. हा राजकीय डाव असावा असे वाटते. परंतु अशी टीका करणे पंतप्रधान नरेंद्र मोदींना शोभत नाही, मोदी वेळकाढूपणा करीत असून बेताल बडबड करीत आहेत, असे वाटते.

# मुख्यमंत्र्यांनीच आनंद दिघेंची प्रॉपर्टी हडपली

## शिवसेना नेते, खासदार संजय राऊत यांचा आरोप

**ठाणे - मुंबईत शिवसेनेची प्रापर्टी जशी मातोश्री आहे तशी ठाण्यात आनंद आश्रम ही आनंद दिघे यांची प्रॉपर्टी आहे. मात्र या ठिकाणी सातबारा आपल्या नावावर करून मुख्यमंत्र्यांनी आनंद दिघे यांची प्रॉपर्टी हडपली आहे असा गंभीर आरोप यावेळी शिवसेना (उध्दव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे नेते खासदार संजय राऊत यांनी केला आहे. जे आनंद आश्रम दिघेचे आहे,त्यावर स्वत:चे नाव लावण्याचा प्रयत्न करण्यात आला असून असे लोक आनंद दिघे यांचे वारस होऊ शकतात का ? असा प्रश्नही त्यांनी यावेळी उपस्थित केला. आनंद दिघे यांची प्रॉपर्टी किती होती असे न विचारता उद्धव ठाकरे यांनी आनंद दिघे यांची प्रॉपर्टी हडप केली का ? असा प्रश्न विचारला असल्याची दाट शक्यता असल्याचे राऊत म्हणाले. राजन विचारे यांच्या प्रचारासाठी ठाण्यातील मनोरमा नगर या ठिकाणी प्रचार सभेचे आयोजन करण्यात आले होते.**

त्यावेळी खासदार संजय राऊत, प्रियांका चतुर्वेदी, आनंद दुबे, काँग्रेस अध्यक्ष विक्रांत चव्हाण, आशिष गिरी, शिवसेनेच्या ज्योती ठाकरे, जिल्हाप्रमुख केदार दिघे, संपर्क प्रमुख नरेश मणेरा महिला जिल्हा संघटक रेखा खोपकर, समिधा मोहिते, शहर प्रमुख प्रदीप शिंदे, राष्ट्रवादी काँग्रेस अध्यक्ष सुहास देसाई, विक्रम खामकर, सुजाता घाग, आपचे धनंजय शिंदे, सतीश सलुजा, संभाजी ब्रिगेड चे चंद्रशेखर पवार, रिपब्लिक पार्टीचे दयानंद उल्मिक, धर्मराज्य पक्षाचे अध्यक्ष राजन राजे, उपजिल्हाप्रमुख ब्रिजेश तिवारी तसेच महाविकास आघाडीचे इतर प्रमुख नेते व पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

शिवसेनेच्या नावावर वाम मार्गाने शिंदे गटाने कोट्यवधी कमवले आणि भाजपच्या वॉशिंग मशीन मध्ये गेले. आनंद दिघे यांच्यावर काढलेला सिमेनाही खोटा असून हा आनंद दिघे यांचा अपमान असल्याचे राऊत म्हणाले. सत्ता आल्यावर राजन विचारे केंद्रात मंत्री झाले पाहिजे असा उल्लेखही राऊत यांनी शेवटी आपल्या भाषणात केला. आपल्या भाषणात संजय राऊत म्हणाले, ४ जून नंतर नरेंद्र मोदी भारतात राहणार नाही, इंग्रजांनी जेवढा देश लुटला नसेल तेवढा यांनी लुटला असून मोदी आणि अमित शहा यांचे पासपोर्ट जप्त करा अशी मागणी राऊत यांनी केली. नरेंद्र मोदी आणि अमित शहा यांनी महाराष्ट्र चालवावा एवढे वाईट दिवस महाराष्ट्रावर आले नाहीत असे राऊत यांनी सांगितले.








### आमचे आनंद दिघे खरे फकीर तर मोदी नकली फकीर

आनंद दिघे खरे फकीर होते तर मोदी हे नकली फकीर असल्याचा टोला राऊत यांनी लगावला आहे. आनंद दिघे हे मोदींसारखे प्रदर्शन करत नव्हते, कोणत्याही पदाची अपेक्षा त्यांनी ठेवली नाही. शिवसेनेची एक पिढी त्यांनी घडवली असल्याचे राऊत म्हणाले.

### जुगारी शेवटचा डाव मंगळसूत्रावर टाकतो

देशातील महिलांचे मंगळसूत्र खेचुन मुसलमानांना देणार या मोदी यांच्या आरोपांवर देखील राऊत यांनी मोदींचा चांगलाच समाचार घेतला. जो स्वतःच्या बायकोचे मंगळसूत्र वाचवू शकला नाही असे सांगत जुगारी शेवटी मंगळसूत्र गहाण टाकतात, आणि आता मोदी तेच करत आहेत असल्याचे राऊत म्हणाले.

### शाहू महाराजांच्या पराभवासाठी मुख्यमंत्री १०० कोटी घेऊन कोल्हापुरात तळ ठोकून होते...

कोल्हापुरात शाहू महाराजाचा पराभव व्हावा यासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे त्या ठिकाणी १०० कोटी घेऊन तळ ठोकून होते. असा गौप्यस्फोट शिवसेना (उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे) नेते संजय राऊत यांनी ठाण्यात झालेला जाहीर सभेत केला. दोन दिवसांपासून मुख्यमंत्री पैसे वाटत असल्याचा आरोप संजय राऊत यांनी यावेळी केला आहे. त्यामुळे यांचे कोल्हापूरच्या गादीवर किती प्रेम आहे हे यावरून लक्षात येत असल्याचे राऊत यांनी सांगितले.

### २०१७ मधील शौचालय टेंडरची अनामत रक्कम मिळवण्यासाठी खटाटोप

# टेंडरची अनामत रक्कमेसाठी अज्ञाताने केल्या तीन अधिकाऱ्यांच्या बनावट सह्या

ठाणे - ठाण्याच्या वर्तकनगर प्रभाग समिती क्षेत्रातील शौचालय दुरुस्ती करण्याचे काम जानव्ही कन्स्ट्रक्शन कंपनी याना देण्यात आलेले होते. सादर कंपनीने निविदासाठी भरलेली अनामत रक्कम परत मिळावी यासाठी आवश्यक ती कागदपत्र आणि कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग, उप अभियंता आणि कनिष्ठ अभियंता यांच्या बनावट साह्य करून अनामत रक्कम ५ लाख १० हजार २५१ रुपये मिळवण्यासाठी खटाटोप करणाऱ्या अज्ञात इसमाच्या विरोधात पीडब्ल्यूडी कार्यकारी अभियंता प्रकाश पांडुरंग खडतरे (५४) यांनी ठाण्याच्या नौपाडा पोलीस ठाण्यात अज्ञात इसमाच्या विरोधात मंगळवार (ता-७ मे) रोजी फसवणुकीचा गुन्हा दाखल केला. नौपाडा पोलीस अधिक तपास करीत आहेत.

तक्रारदार प्रकाश पांडुरंग खडतरे (५४) रा.३०१, मंगलमुर्ती, वदना सिनेमा जवळ, आग्रा रोड, ठाणे हे पीडब्ल्यूडी मध्ये कार्यकारी अभियंता पदावर कार्यरत आहेत. कामाची जाहिरात दिल्यानंतर निविदा भरणाऱ्या कंपन्यांकडून अनामत रक्कम म्हणून ५ टक्के रक्कम ईएमडी म्हणून घेण्यात येते. सदरची रक्कम परत घेण्यासाठी अज्ञाताने प्रक्रियेतील अधिकारी यांच्या बनावट सह्या करून रक्कम रक्कम अधिकाऱ्यांच्या साह्य असल्याने लेख परीक्षण विभागाने तो परतावा केला. यासाठी अज्ञाताने पालिका प्रशासनाला परताया प्रमाणपत्र, परतावा देयक, कप्लीशन सर्टीफिकेट, परतावा सादर प्रत्त, परतावा टिपणी प्रत असे बनावट दस्त व सही शिक्का तयार करून सादर केल्यानंतर मे जानव्ही कन्ट्रक्शन कंपनीला परत दिले. काम पूर्ण झाल्यानंतर सदरची अनामत रक्कम ही रितसर कार्यकारी अभियंता कार्यालय यांना सुरक्षा अनामत रक्कम परत मिळणेकरीता विनंती अर्ज करावा लागतो, सदर अर्जावर कनिष्ठ अभियंता, उप अभियंता व कार्यकारी अभियंता हे अधिकारी त्यांचे स्वाक्षरीने अर्ज मंजुर करतात. सदर अर्जप्रस्ताव कार्यकारी अभियंता कार्यालयातुन पुढे लेखा शाखा ठाणे मनपा यांचेकडे रितसर जावक क्रमांकाव्दारे पुढील कार्यवाहीस्तव पाठविण्यात येते. सदर अर्जप्रस्तावावर लेखा शाखेचे अधिकारी याचेव्दारे खातरजमा करून मुख्य लेखा व वित्त अधिकारी याचे मजुरीने ठेकेदार यांस त्यांची सुरक्षा अनामत रक्कम त्यांचे बँक खात्यावर ट्रान्सफर करून परतावा दिला जातो.अशी प्रक्रिया असताना शौचालयाचे काम २०१७ मध्ये जान्हवी कँष्ट्रक्शन कंपनीला दिले. त्याची अनामत रक्कम ५ लाख १० हजार २५१ हि रक्कम परत मिळावी यासाठी अज्ञाताने सुरक्षा अनामत रक्कम परतावा प्रमाणपत्र, परतावा देयक, कंप्लीशन सर्टीफिकेट, पस्तावा सादर प्रत, परतावा टिपणी प्रत या कागदपत्रांवर माझी व कनिश्ठ अभियंता श्री सुधीर सोनवणे तसेच उप अभियंता शैलेंद्र चारी यांच्या खोटया स्वाक्षरी केल्या. दरम्यान अनामत रक्कम देण्यापूर्वी तपासणीत वर्तकनगर प्रभाग समितीत मे, जान्हवी इंटरप्राईजेस यांची सुरक्षा अनामत रक्कम परत मिळणेबाबतचा अर्ज प्राप्त नव्हता. मात्र सदरची रक्कम जान्हवी इंटरप्राइझेस याना लेख परीक्षण विभागाने परस्पर देण्यात आल्याचे समोर आले.

मे. जानव्ही कन्स्ट्रक्शन कंपनीच्या अनामत रक्कमेसाठी अज्ञाताने पालिका प्रशासनाला बनावट दस्त आणि बनावट साह्य करून फसवणूक केल्याची तक्रार मंगळवारी ७ मे , २०२४ रोजी नौपाडा पोलीस ठाण्यात दाखल केली. सादर प्रकरणी नौपाडा पोलिसांनी अज्ञाताच्या विरोधात फसवणुकीचा गुन्हा दाखल केला आहे.

## मतदानाच्या जागृतीसाठी ठाण्यात शनिवारी मिनी मॅरेथॉन

**(पान १ वरून)** शनिवार, ११ मे रोजी आयोजित करण्यात आली आहे. त्यात नागरिकांनी मोठ्या प्रमाणावर सहभागी व्हावे आणि मतदानाचा संदेश घरोघरी पोहोचवावा, असे आवाहन आयुक्त सौरभ राव यांनी केले आहे.

शनिवारी, स. ६.३० वा. डॉ. काशिनाथ घाणेकर नाट्यगृहाच्या समोर या मिनी मॅरेथॉनला जिल्हाधिकारी अशोक शिनगारे आणि महापालिका आयुक्त सौरभ राव हे हिरवा झेंडा दाखवतील. या मॅरेथॉनमध्ये १२ वर्षावरील, १५ वर्षाखालील, १८ वर्षाखालील, १८ वर्षांपेक्षा मोठ, तृतीयपंथीय असे गट करण्यात आले आहेत. मॅरेथॉनचा पारितोषिक वितरण समारंभ घाणेकर सभागृहात होणार आहे.

शनिवार, ११ मे रोजी होणाऱ्या मिनी मॅरेथॉनसाठी नोंदणी करण्यासाठी लिंक - http://thanecitizens.org/mini-marathon-registration/

## १४२- कल्याण पूर्व मतदारसंघातील विविध चाळी व सोसायट्यांमध्ये गृहभेटीद्वारे मतदान जनजागृती

**(पान १ वरून)** जय माँ दुर्गा कॉलनी, जय महालक्ष्मी सोसायटी, एल.डी. गायकवाड चाळ, महालक्ष्मी सोसायटी, जय बजरंग चाळ, न्यू अनमोल सोसायटी, मयुर सोसायटी , न्यु शबरी सोसायटी, श्री निवास कॉलनी या ठिकाणी घरोघरी जाऊन मतदान जनजागृतीचा कार्यक्रम करुन मतदारांना मतदान करण्याबाबत आवाहन केले.

त्याचप्रमाणे या ठिकाणी निवडणुकीविषयी पत्रके वाटण्यात आली. तसेच सदर परिसरातील नागरिकांना मतदानाचे महत्व पटवून देण्यात आले. या परिसरात लाऊड स्पिकरद्वारे मतदान जनजागृतीपर गीत वाजवून त्यांना येत्या २० मे रोजी मतदान करण्याबाबत आवाहन करण्यात आले. यावेळी स्वीप टिमचे कर्मचारी समाधान मोरे, विलास नंदनवार, सर्जेश वेलेकर, अजय खंडाळे, भारती डगळे उपस्थित होते.

### ठाणे महानगरपालिका, ठाणे

**ठाणे महानगरपालिकेच्या अधिकार क्षेत्रातील सी-१ श्रेणीतील अतिधोकादायक व मोडकळीस आलेल्या इमारतीत राहणाऱ्या रहिवाशांसाठी सूचना.**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या कलम २६४ च्या तरतुदी अन्वये ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेल्या इमारतींना अतिधोकादायक घोषित करण्यात आलेले आहे. सदर इमारतींतील रहिवाशांना त्यांच्या निवासस्थाने रिक्त करण्याकरिता महापालिकेकडून वेळोवेळी कळविण्यात आलेले आहे. तथापि, काही इमारतींमध्ये अजूनही नागरीक वास्तव्यास आहेत.सदर इमारतींतील नागरिकांनी त्यांच्या इमारतीचा ताबा त्वरीत सोडून, सदर इमारत स्वत:हून निष्कासित करावी.उपकर प्राप्त इमारती व इतर धोकादायक मोडकळीस आलेल्या इमारतींबाबत संबंधित सक्षम प्राधिकरण यांनी गरजेप्रमाणे योग्य त्या पावसाळयापुर्वीच्या उपाययोजना कराव्यात. सदर इमारती कोसळून काही दुर्घटना घडल्यास व त्यात जिवित व वित्तहानी झाल्यास त्याबाबतची जबाबदारी इमारतींमध्ये वास्तव्य करणाऱ्या संबंधित नागरिकांची व संबंधित सक्षम प्राधिकरणाची राहील, त्याकरिता महानगरपालिका जबाबदार राहणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

सदर अतिधोकादायक घोषित करण्यात आलेल्या इमारतींची प्रभागनिहाय यादी ठाणे महानगरपालिकेच्या **thanecity.gov.in** या संकेतस्थंळावर असून नागरिक आपली इमारत अतिधोकादायक घोषित केलेल्या यादीमध्ये आहे किंवा नाही याची खात्री करू शकतात.

**वास्तव्यास असणारी इमारत ढोबळ मानाने अतिधोकादायक झाली आहे, याबाबत काही प्राथमिक लक्षणे आढळून येतात ती खालीलप्रमाणे.**

१) इमारतीच्या आर.सी.सी.फ्रेम, कॉलम, बीम, स्लॅब इ.रचनेत बदल होत असल्याचे आढळ्यास उदा.- इमारतीचे कॉलम झुकल्यासारखे दिसून आल्यास, इमारतीचे बीम झुकल्यासारखे दिसून आल्यास, इमारतीचा स्लॅब झुकल्यासारखा दिसून आल्यास.
२) इमारतीच्या तळ मजल्याचा भाग खचल्यासारखा दिसून आल्यास.......
३) इमारतीच्या कॉलममधील भेगा वाढत असल्याचे दिसून आल्यास.......
४) इमारतीच्या कॉलममधील काँक्रीट पडत असल्याचे दिसून आल्यास.......
५) इमारतीच्या कॉलमचा भाग फुगल्यासारखा दिसल्यास.........
६) इमारतींच्या आर.सी.सी मेंबर्स (कॉलम, बीम्स) व विटाची भिंत यातील सांधा/ भेगा वाढत असल्यास......
७) स्लॅबचे किंवा बीम चे तळमजल्याचे काँक्रीट पडत असल्यास......
८) इमारतीच्या गिलाव्यामध्ये (प्लास्टर) मोठ्या प्रमाणात भेगा वाढत असल्यास.......
९) इमारतीच्या काही भागात विशिष्ट आवाज होत असल्यास....
१०) इमारतीच्या स्लॅब,बीम, कॉलमच्या भेगांमुळे लोखंडी शिगांचा आकार गंजल्यामुळे कमी झालेला असल्यास.

**अशा परिस्थितीत वास्तव्यास असणाऱ्या रहिवाश्यांनी काय काळजी घ्यावी.**

१) ठाणे महानगरपालिकेचे २४x७ कार्यरत असलेल्या आपत्कालीन व्यवस्थापन कक्षाच्या १८००२२२१०८ या दूरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा.
२) सदर इमारत तातडीने रिकामी करावी.
३) आजुबाजूच्या इमारतीतील रहिवाश्यांना सुध्दा सतर्क राहण्यास अवगत करावे.
४) तातडीने तज्ञ आर.सी.सी. तांत्रिक सल्लागार यांना दाखवून प्रॉप्स / टेकू लावण्यासंदर्भात त्वरेने कार्यवाही करावी.

ठाणे महानगरपालिका हद्दीतील नागरिकांची जिवित व वित्तहानी टाळण्याच्या दृष्टिने जागरूक राहणे ही नागरीकांचीही जबाबदारी आहे. त्यामुळे आपण सर्वजण जबाबदार नागरिक म्हणून आपापल्या परिसरातील इमारतींवर लक्ष ठेवुन भविष्यातील दुर्घटना आपणांस टाळता येईल.

**ब) खाजगी इमारतींचे अनिवार्य संरचानात्मक परिक्षण**

ठाणे महानगरपालिका निवासी / अनिवासी इमारतींचे मालक/ भोगवटादार सहकारी संस्था यांना याद्वारे कळविण्यात येते की, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या कलम २६४ च्या तरतुदीनुसार प्रत्येक इमारतीचे मालक व भोगवटादार यांनी सध्या ज्या इमारती अस्तित्वात आहेत आणि ३० वर्षापेक्षा जास्त कालावधीकरिता वापरात आहेत अशा इमारतींची ठाणे महानगरपालिकेकडे सदर नोंदणीकृत असलेल्या ठाणे महानगरपालिकेच्या तालिकेवर नेमणुक केलेल्या स्ट्रक्चरल इंजिनियर यांच्याकडुन परीक्षण करून घेणे अनिवार्य आहे.

१) पालिकेद्वारे सदर इमारत पूर्णत्वाच्या प्रमाणपत्राच्या निर्गमन किंवा
२) कलम ३५३ ए अंतर्गत इमारतीचा ताबा घेण्याकरिता प्रदान करण्यात आलेली परवानगी.
३) सदर इमारतींतील एकूण बांधकाम क्षेत्राच्या किमान ५०% प्रत्यक्ष ताबा घेणे

उपरोक्त १ ते ३ पैकी जे प्रथम अस्तित्वात / घडले ते प्रमाण मानून इमारतीचे आयुष्य ठरवून नोंदणीकृत संरचनात्मक अभियंता / संस्था यांच्यामार्फत संरचनात्मक परिक्षण करून सक्षम प्राधिकाऱ्याकडून परवानगी मिळवून अहर्ताप्राप्त संरचनात्मक अभियंताद्वारे सूचना दिल्यानुसार दुरूस्ती कामे पार पाडणे याकरिता व , ठाणे महानगरपालिकेकडे संरचनात्मक प्रमाणपत्र समवेत (स्ट्रक्चरल फिटनेस सर्टिफिकेट) पूर्तता प्रमाणपत्र सादर करणे सुध्दा अनिवार्य आहे.

इमारतीचे सर्व मालक / भोगवटादारांनी सदर इमारतीचे संरचनात्मक अभियंताद्वारे परीक्षण करून घ्यायचे आहे आणि या जाहीर सूचनेच्या प्रसिध्दी पासून ३० दिवसांच्या कालावधीच्या आत संबंधित विभागीय सहाय्यक आयुक्तांकडे संरचनात्मक स्थैर्यताप्रमाणपत्र (Structural Stabillity Certificate) सादर करावयाचे आहे.

जर संरचनात्मक अभियंत्याने इमारतीच्या संरचनात्मक स्थैर्याची खात्री करून घेण्याकरिता कोणत्याही दुरूस्तीचे काम सुचित केले असेल, तर त्यानुसार सदरची दुरूस्ती अहवालाच्या सादरीकरणाच्या दिवसापासून सहा महिन्याच्या कालावधीमध्ये किंवा संरचानात्मक अभियंत्याने सुचित केलेल्या कालावधीत महानगरपालिका आयुक्तांचे समाधान होईपर्यंत सक्षम प्राधिकाऱ्याकडुन परवानगी मिळवून इमारतीच्या मालक / भोगवटादार / संस्थेद्वारा पूर्ण करण्यात येईल. जर मालक / भोगवटादार / सहकारी संस्था महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या कलम २६४ च्या अंतर्गत निर्गमित केलेल्या सुचनांचे पालन करण्यास असमर्थ ठरल्यास मालक/ भोगवटादार / संस्था यांच्याविरूध्द मनपा अधिनियमातील तरतुदीनुसार पुढील कारवाई करण्यात येईल.

नागरिकांच्या /सामान्य जनतेच्या हितार्थ जाहीर आवाहन करण्यात येत आहे.

ठामपा/पिआरओ/अ.नि.वि/ २६/ २०२४-२५
दि.०८.०५.२०२४
plsvisitourofficialweb-site
**www.thanecity.gov.in**

**सही/-**
उपआयुक्त
अतिक्रमण नियंत्रण व निष्कासन विभाग,
ठाणे महानगरपालिका, ठाणे.

# पनवेल महानगरपालिकेच्यावतीने मतदान जनजागृतीसाठी स्वाक्षरी अभियान

पनवेल - सार्वत्रिक लोकसभा निवडणूक २०२४ च्या पार्श्वभूमीवरती स्वीप कार्यक्रमांतर्गत नागरिकांमध्ये मतदान जनजागृती करण्यासाठी महापालिकेच्यावतीने 'स्वाक्षरी अभियान' राबविले जात असून आयुक्त डॉ. प्रशांत रसाळ यांनी स्वाक्षरी फलकावरती स्वाक्षरी करून या अभियानाचे उद्घाटन केले.

या स्वाक्षरी अभियानांतर्गत मोठा स्वाक्षरी फलक महापालिका मुख्यालयात उभा करण्यात आला आहे. उद्घाटन प्रसंगी अतिरिक्त आयुक्त भारत राठोड, सहाय्यक संचालक नगररचना अधिकारी ज्योती कवाडे, उपायुक्त कैलास गावडे,उपायुक्त मारुती गायकवाड, शहरअभियंता संजय जगताप, मुख्य लेखा अधिकारी मंगेश गावडे, मुख्य वैद्यकिय अधिकारी डॉ. आनंद गोसावी, मुख्य लेखा परिक्षक निलेश नलावडे, लेखा अधिकारी संग्राम व्हारेकाटे, उपमुख्य लेखापरिक्षक संदिप खुरपे, कार्यकारी अभियंता संजय कटेकर, सहायक आयुक्त स्वरूप खारगे, उपअभियंता विलास चव्हाण सर्वांनी आपली स्वाक्षरी करून मतदान करण्याबाबत संदेश सर्वांना दिला. या पध्दतीने वडाळा तलाव व पनवेल रेल्वे स्थानकावरती देखील स्वाक्षरी




अभियान राबविण्यात येणार आहे.

याबरोबर ३३ मावळ लोकसभा मतदारसंघामधील १८८ पनवेल विधानसभा मतदार संघांत आशा सेविका बैठका घेऊन मतदार जनजागृती करत आहेत. तसेच चारही प्रभागामध्ये घरोघरी जाऊन मतदान जनजागृतीपर पत्रकाचे वाटप करत आहेत. तसेच महापालिकेच्या अधिकाऱ्यांमार्फत डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन पनवेल, वळवली व पंचशील नगर येथे बचत गटांच्या बैठका घेऊन मतदान करण्याबाबत जनजागृती केली जात आहे.

दैनिक महाराष्ट्र सम्राट
सम्राट अनेक परंतु बातम्यांचा एकच !
संपादक : गणेश चंद्रकांत भोईटे



## महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी लि.

■ जागा : ५३४७
■ पदाचे नाव: विद्युत सहाय्यक
■ शैक्षणिक पात्रता: (i) १०+२ बंधातील माध्यमिक शालांत परीक्षा (१०वी) (ii) ITI (विजतंत्री/तारतंत्री (Electrician / Wireman) किंवा महाराष्ट्र राज्य व्यवसाय परीक्षा मंडळ यांनी प्रमाणित केलेले ०२ वर्षांचा पदविका (Electrician / Wireman) अभ्यासक्रम प्रमाणपत्र.
■ वयाची अट: २९ डिसेंबर २०२३ रोजी १८ ते २७ वर्षे मागासवर्गीय/आ.दु.घ.: ०५ वर्षे सूट
■ वय गणकयंत्र: वय मोजा
■ नोकरी ठिकाण: संपूर्ण महाराष्ट्र
■ फी : खुला प्रवर्ग: २५०/- मागासवर्गीय/आ.दु.घ./अनाथ: १२५/-
■ अर्ज करण्याची शेवटची तारीख: २० मे २०२४
■ अधिकृत वेबसाईट: https://www.mahadiscom.in/

## हिंदुस्थान उर्वरक आणि रसायन लिमिटेड

■ जागा : ८०
१ मॅनेजर / (L2)
२ इंजिनिअर/ (L-1)
३ ऑफिसर/ (L-1)
४ चीफ मॅनेजर/ (L-3)
५ असिस्टंट मॅनेजर/(L1) FTC
६ ऑफिसर/(L1) FTC
■ शैक्षणिक पात्रता:
पद क्र.१: (i) ६०% गुणांसह इंजिनिरिंग पदवी/B.Sc.(-gri)+ M.Sc./CA/CMA (ii) १२ वर्षे अनुभव
पद क्र.२: (i) ६०% गुणांसह इंजिनिरिंग पदवी (ii) ०२ वर्षे अनुभव
पद क्र.३: (i) ६०% गुणांसह इंजिनिरिंग पदवी/MBA/CA/CMA (ii) ०२ वर्षे अनुभव
पद क्र.४: (i) CA/CMA/ PGDM$^2$/ MBA (Finance) (ii) १९ वर्षे अनुभव
पद क्र.५: (i) ६०% गुणांसह पदवी/PG डिप्लोमा (Communication/ -dvertising Communication Management/Public Relations/ Mass Communication/ Journalism) किंवा MBA/MSW किंवा B.Sc. (Agri)+ M.Sc.(Agriculture) किंवा BSc.Agri/B.Tech+ MBA/PGDBM$^2$ (ii) ०७ वर्षे अनुभव
पद क्र.६: (i) LLB (ii) ०५ वर्षे अनुभव
■ वयाची अट: २० मे २०२४ रोजी, SC/ST: ०५ वर्षे सूट, OBC: ०३ वर्षे सूट
पद क्र.१: ४० वर्षांपर्यंत
पद क्र.२: ३० वर्षांपर्यंत
पद क्र.३: ३० वर्षांपर्यंत
पद क्र.४: ४७ वर्षांपर्यंत
पद क्र.५: ४५ वर्षांपर्यंत
पद क्र.६: ३५ वर्षांपर्यंत
■ वय गणकयंत्र: वय मोजा
■ नोकरी ठिकाण: संपूर्ण भारत
■फी : फी नाही.
■ अर्ज करण्याची शेवटची तारीख: २० मे २०२४
■ अधिकृत वेबसाईट: https://hurl.net.in/

## भारतीय आर्थिक/सांख्यिकी सेवा परीक्षा

■ जागा : ४८ जागा
■ IES भारतीय आर्थिक सेवा परीक्षा
■ ISS भारतीय सांख्यिकी सेवा परीक्षा
■ शैक्षणिक पात्रता:
■ IES : पदव्युत्तर पदवी. (Economics/Applied Economics/ Business Economics/Econometrics)
ISS: nXdr (Statistics/Mathematical Statistics/Applied Statistics) किंवा पदव्युत्तर पदवी (Statistics/ Mathematical Statistics/Applied Statistics)
वयाची अट: ०१ ऑगस्ट २०२४ रोजी २१ ते ३० वर्षे, SC/ST: ०५ वर्षे सूट, OBC: ०३ वर्षे सूट
■ वय गणकयंत्र: वय मोजा
■ नोकरी ठिकाण: संपूर्ण भारत.
■ Fee: General/OBC: 200/- SC/ST/PWD/महिला:फी नाही
■ अर्ज करण्याची शेवटची तारीख: ३० एप्रिल २०२४
■ परीक्षा: २१ जून २०२४
■ अधिकृत वेबसाईट: https://upsc.gov.in/

## मुंबई नेव्हल डॉकयार्ड

■ पदाचे नाव: अप्रेंटिस (प्रशिक्षणार्थी)
१ इलेक्ट्रिशियन
२ इलेक्ट्रोप्लेटर
३ फिटर
४ फाउंड्रीमन
५ मेकॅनिक
६ इन्स्ट्रुमेंट मेकॅनिक
७ मशीनिस्ट
८ चचढच्
९ पेंटर
१० पॅटर्न मेकर
११ पाईप फिटर
१२ इलेक्ट्रॉनिक्स मेकॅनिक
१३ मेकॅनिक Reff.
१४ शीट मेटल वर्कर ०३
१५ शिपराईट (Wood) १८
१६ टेलर (G) ०३
१७ वेल्डर (G E) २०
१८ मेसन (BC) ०८
१९ I CTSM$^2$ ०३
२० शिपराईट (Steel) १६
२१ रिगर १२
२२ फोर्जर हीट ट्रीटर ०१
■ शैक्षणिक पात्रता:
रिगर: ०८वी उत्तीर्ण
फोर्जर हीट ट्रीटर: १०वी उत्तीर्ण
उर्वरित पदे: संबंधित ट्रेड मध्ये ITI (NCVT/SCVT)
■ शारीरिक पात्रता: उंची छाती वजन १५० सेमी फूगवून ०५ सेमी जास्त ४५
वयाची अट: किमान १४ वर्षे SC/ST: ०५ वर्षे सूट
■ अर्ज करण्याची शेवटची तारीख: १० मे २०२४
■ परीक्षा: मे/जून २०२४
■ अधिकृत वेबसाईट: https://www.indiannavy.nic.in/

## केंद्रीय सशस्त्र पोलीस दल

■ परीक्षेचे नाव: संयुक्त केंद्रीय सशस्त्र पोलीस दल (असिस्टंट कमांडंट) परीक्षा २०२४
■ जागा : ५०६
■ पदाचे नाव: असिस्टंट कमांडंट
1 BSF
2 CRPF
3 CISF
4 ITBP
5 SSB
■ शैक्षणिक पात्रता: कोणत्याही शाखेतील पदवी.
■ शारीरिक पात्रता:
पुरुष/महिला उंची छाती वजन
पुरुष १६५ से.मी. ८१-८६ से.मी. ५० ज्ञस
महिला १५७ से.मी. - ४६ ज्ञस
■ वयाची अट: ०१ ऑगस्ट २०२४ रोजी २० ते २५ वर्षे SC/ST: ०५ वर्षे सूट, OBC: ०३ वर्षे सूट
■ वय गणकयंत्र: वय मोजा
■ नोकरी ठिकाण: संपूर्ण भारत.
■ Fee: General/OBC: 200/- SC/ST/महिला: फी नाही
■ अर्ज करण्याची शेवटची तारीख: १४ मे २०२४
■ लेखी परीक्षा: ०४ ऑगस्ट २०२४
■ अधिकृत वेबसाईट: https://www.mha.gov.in/en/about-us/central-armed-police-forces

## आर्ममेंट रिसर्च डेव्हलपमेंट एस्टॅब्लिशमेंट

■ जागा : २०
■ ज्युनियर रिसर्च फेलो
■ रिसर्च असोसिएट
■ शैक्षणिक पात्रता:
पद क्र.१: प्रथम श्रेणी BE/B.Tech+NET/GATE किंवा प्रथम श्रेणी M.Sc+NET
पद क्र.२: (i) PhD (ii) ME/M.Tech (iii) ०३ वर्षे अनुभव
वयाची अट: २८ वर्षांपर्यंत SC/ST: ०५ वर्षे सूट, OBC: ०३ वर्षे सूट
■ वय गणकयंत्र: वय मोजा
■ नोकरी ठिकाण: पुणे
■ : फी नाही.
■ अर्ज पाठविण्याचा पत्ता: The Director, Armament Research Development Establishment (ARDE), Armament Post, Pashan, Pune- 411021
■ अर्ज पोहचण्याची शेवटची तारीख: ३१ मे २०२४
■ अधिकृत वेबसाईट: https://www.drdo.gov.in/drdo/labs-and-establishments/armament-research-development-establishment-arde

## दक्षिण पूर्व मध्य रेल्वे

■ Grand Total : २७०७ जागा (८६१+१११३+७३३)
■ P (SECR) अप्रेंटिस पदाच्या ८६१ जागांसाठी भरती (नागपूर)
■ P (SECR) अप्रेंटिस पदाच्या १११३ जागांसाठी भरती (रायपूर)
■ P (SECR) अप्रेंटिस पदाच्या ७३३ जागांसाठी भरती (बिलासपूर)
■ जाहिरात क्र.: P/NGP/SAS/२०२४/१६
■ आस्थापना क्र.: E०५२०२७०२६९५ E०५२०२७०२४९४
■ Total: ८६१ जागा
■ पदाचे नाव: अप्रेंटिस (प्रशिक्षणार्थी)
■ शैक्षणिक पात्रता: (i) ५०% गुणांसह १०वी उत्तीर्ण (ii) संबंधित ट्रेड मध्ये ITI
■ वयाची अट: १० एप्रिल २०२४ रोजी १५ ते २४ वर्षे SC/ST: ०५ वर्षे सूट, OBC: ०३ वर्षे सूट
■ वय गणकयंत्र: वय मोजा
■ नोकरी ठिकाण: नागपूर
■ फी : फी नाही.
■ अर्ज करण्याची शेवटची तारीख: ०९ मे २०२४
■ अधिकृत वेबसाईट: https://secr.indianrailways.gov.in/

# प्राण गेला तरी बेहत्तर, शत्रुपुढे झुकणार नाही

मेवाडचे राजा क्रांतीसूर्य महाराणा प्रतापसिंह सिसोदिया म्हणजे वीरता, त्याग, धैर्य, बलिदान, चारित्र्यशिलता, राष्ट्रभक्ती, देशाभिमान याचं. मूर्तिमंत प्रतिक होय.अशा महापराक्रमी व अपराजित राजाचा जन्म सिसोदिया राजवंशात ९ मे १५४० रोजी कुंभलगड येथे झाला,अन् जणू हिंदुत्वाचा रक्षणकर्ता क्रांतीसूर्यच भारतभूमीवर उदयास आला. महाराणा प्रतापसिंह यांच्या पिताश्रीचे नाव राणा उदयसिंह अन् मातोश्रीचे महाराणी जयवंता कुंवर.


बाप्पा रावल, राणा खुमानसिंह, समरसिंह, राणासंग, राणाकुंभ, उदयसिंह यांचा वैभवशाली व शौर्याचा वारसा महाराणा प्रतापांनी जीवनाच्या अखेरच्या श्वासापर्यंत जपला. म्हणूनच ते क्रांतीसुर्य म्हणवले गेले. त्यांचा राज्याभिषेक गोगुंदा येथे संपन्न झाला. मेवाडच्या राजांचे आराध्य दैवत एकलिंग महादेव असून, हे मंदिर राणा बाप्पा रावल यांनी उदयपूर येथे ८ व्या शतकात उभारले. मेवाड व चितोड म्हणजेच अखंड राजपुतानाला अकबर बादशहाच्या हुकूमतपासून सुरक्षित ठेवण्यासाठी राणा प्रतापांनी आपलं सारं आयुष्य पणाला लावलं. प्राण गेला तरी बेहत्तर, पण कोणा शत्रूपुढे झुकणार नाही ही त्यांची भीष्मप्रतिज्ञा होती. पारतंत्र्याच्या साखरभातापेक्षा, मला माझ्या स्वातंत्र्यातली मीठभाकरी, कंदमुळे प्रिय आहेत, असे राणा अभिमानाने सांगत असत. जंगलात वास्तव्याला असताना कोणाचीही लाचारी न पत्करता,घासच्या बियांची भाकरी करून ते खात असत. दरम्यान आपल्या कुटुंबियांसाठी त्यांनी कोणापुढे हात पसरविले नाहीत. यालाच खऱ्या अर्थाने स्वाभिमानी बाणा जपणं म्हणतात.यास्तव महाराणा प्रताप यांना जयंती दिनानिमित्त त्रिवार मानाचा मुजरा!जय राणा!

महाराणा प्रताप यांच्यापाशी अकबर बादशहाच्या तुलनेत सैन्यबळ व युद्धसामग्री अत्यल्प असूनही महाराणा प्रताप हे सन १५७६ ते १५८६ या दशकात मोगल सैन्यांशी प्राणपणाने लढले.हळदीघाट अन् खमनौरच्या युद्धांत वनवासी धनुष्यधारींच्या सहाय्याने अकबर बादशाह व त्याच्या सैन्याला जेरीस आणून त्यांना रणांगणातून माघारी जाण्यास भाग पाडलं.या युद्धादरम्यान वनवासी धनुर्धारींनी राणा प्रतापांना मोलाची मदत केली.पहाडी क्षेत्रात युद्ध करण्याचे तंत्र केवळ वनवासींनाच ज्ञात असल्याने त्यांनी पहाडी युद्धतंत्राबाबत अनभिज्ञ असलेल्या मोगल सैनिकांना रणांगणावरून सळो की पळो करून सोडलं.वास्तवात १६ व्या शतकातही गनिमी कावा या युद्धतंत्राचा प्रयोग केला होता, असे वाटते. या युद्धादरम्यान पाठीमागून वार करणाऱ्या एका मोगल सरदारावर राणा प्रतापांनी अशा शिताफीने तलवारीचा प्रतीवार केला की,त्या सरदारचे मुंडके अन् त्याच्या घोड्याचे मुंडके एकाच वेळी धडापासून वेगळे होऊन रणभूमीवर पडले.यावरून हे सिद्ध होते की,राणा प्रतापांच्या तलवारीच्या एका वारमध्ये किती प्रबळ शक्ती होती.ते खऱ्या अर्थाने बाहुबली होते,हे यावरून सिध्दीस येते.

शतकानुशतके भारतियांच्या हृदयात मानाचं स्थान ग्रहण करणाऱ्या महाराणा प्रतापसिंह सिसोदिया यांनी एक शपथ घेतली होती की, मी बाप्पा रावल यांचा वंशज...माझ्या मातृभूमीला शत्रूपासून मुक्त केल्याशिवाय मी महलात राहणार नाही. सोन्या-चांदीच्या ताटात भोजन करणार नाही.राजमहालच्या शयनगृहात झोपणार नाही.तर वृक्षांची छाया हाच माझा महाल,गवत हाच माझा बिछाना अन् झाडांची पानं हीच माझी भोजनाची भांडी राहतील महत्वाचे म्हणजे राणा प्रतापांचे भारदस्त व्यक्तिमत्त्व कोणाच्याही मनाला भावणारं होतं.धिप्पाड शरीरयष्टी(७ फूट उंची तर वजन १२० किलो), श्वेतवर्ण, भेदक डोळे, लांब मिश्या, पिळदार भुजा अन् निधडी छाती अशी त्यांची बलदंड देहयष्टी होती. युद्धाच्या वेळी त्यांच्या अंगावर चिलखत तसेच भाला, तलवार(दोन)या युद्ध साहित्याचे वजन सुमारे २०८ किलो असायचे. यावरून त्यांच्या शारीरिक बळाचा अंदाज येतो. दोन तलवारी बाळगण्याचे कारण म्हणजे एक स्वतःसाठी अन् दुसरी निहत्यारी शत्रुसाठी असायची. म्हणजेच शत्रूकडे जर मुकाबला करण्यास तलवार नसेल,तर त्यावर हल्ला न करता, आधी त्याला तलवार द्यायची अन् नंतर त्याच्याशी युद्ध करायचे,हा त्यांचा क्षत्रिय बाणा होता अन् यालाच खऱ्या अर्थानं शौर्यवान योद्धा म्हणतात.

युद्धभूमीवरील राणा प्रतापांचे असे अवाढव्य अन् भारदस्त रूप पाहिल्याने अकबर बादशहांनी आपल्या आख्या जीवनात कधीही राणा प्रतापांसमोर युद्ध करण्याचे धाडस दाखविलं नाही.औ त्यांच्या जागी अकबर बादशाह हे नेहमी मोगल सरदार राजा मानसिंह किंवा पुत्र सलीम (जहांगीर) यांना युद्धभूमीवर महाराणासमोर उभे करायचे.मात्र स्वतः त्यांनी कधीच महाराणांसमोर थेट युद्ध करण्याचं साहस दाखविलं नाही.यावरून हे सिद्ध होते की,अकबर बादशहाच्या मनात राणा प्रतापांबद्दल केवढं मोठं भय होतं. हा तर खरा करिश्मा होता राणा प्रतापांच्या युद्धकौशल्याचा!या पार्श्वभूमीवरच त्यांना साहसी अन् अपराजित राजा म्हटलं जातं*

हळदीघाटाच्या युद्धात राणा प्रतापचे अंगरक्षक हकीमखां सूर आणि जालौरचा ताजखां या मुस्लिम सरदारांनी तर, चूनावत कृष्ण दास,झाला मानसिंह, झाला बिजा, राणा पुंजा भिल, भीमसिंह रावत सांगा, रामदास, भामाशाह ताराचंद, रामशाह व त्यांचे सुपुत्र शालिवाहन, भगवानसिंह, प्रतापसिंह आदी शूरवीर योद्ध्यांनी मोलाची कामगिरी केली. दरम्यान राणा भामा शाह यांनी राणा प्रतापांना पडतीच्या काळात सैन्य दलाची नव्याने उभारणी करण्यासाठी अन् राष्ट्र रक्षणार्थ आपली संपूर्ण धनसंपत्ती अर्पण केली.यावरून भामाशाहचे औदार्य अन् निस्सीम राष्ट्रप्रेम दृष्टोत्पत्तीस येते. यास्तव त्यांनाही आम्ही



भारतीय दंडवत प्रणाम करतो.

राणा प्रताप व त्यांच्या कुटुंबियांचे रानावनात वास्तव्य असताना वनवासींनी त्यांचे जागोजागी स्वागत करून त्यांच्या राहण्याची-भोजनाची व्यवस्था केली. त्यांच्या कुटुंबियांसाठी रात्रंदिवस पहारा देत डोळ्यात तेल घालून शत्रूपक्षापासून रक्षण केलं.महत्वाचे म्हणजे राणा प्रतापांना युद्धाच्या वेळी पावलोपावली वनवासींनी मदतीचा हात दिला. उल्लेखनीय गोष्ट म्हणजे महाराणा प्रतापांचा धारदार भाला, राजपुतांची तळपती तलवार आणि वनवासी सैनिकांच्या तीरकामट्यांच्या वर्षावाने मोगल सैनिकांची दाणादाण उडाली. खरं तर, राणा प्रतापांना त्यांच्या संक्रमण काळात वनवासी समाजाने निष्ठापूर्वक भक्कम पाठबळ दिलं, याची इतिहासात नोंद घेतली गेली.यासाठीच मेवाडच्या राजचिन्हावर राजपूत सैनिक आणि वनवासी सैनिकाची प्रतिमा कोरून दोन्ही समाजातल्या बंधुत्वाचं प्रतिक प्रतिबिंबित केलं, याला मेवाड-चितोडचा इतिहास साक्षीदार आहे.

हळदीघाट व अन्य युद्धात संपादन केलेल्या विजयात राणा प्रताप यांच्या चेतक अश्वाचा मोलाचा वाटा राहिला. रणांगणावर संकटसमयी स्वतःचा जीव धोक्यात टाकून आपल्या धन्याचे प्राण वाचविणाऱ्या चेतकची स्वामिनिष्ठा अतुलनीय व अवर्णनीय आहे. म्हणूनच राणा प्रताप हे चेतकला आपल्या गळ्याचे ताईत मानत असत. स्वतः जखमी अवस्थेत असूनही २० मीटर लांबीच्या नाल्यावरून छलांग मारून धन्याचे प्राण वाचविण्याची महान कामगिरी चेतकने केली अन् आपली जबाबदारी पूर्ण केल्यावर आपले प्राण सोडले.त्यानंतर कृतज्ञतेच्या भावनेतून राणा प्रतापांनी चेतकचे जारोळ येथे स्मृतीस्मारक उभारले. चेतकची धन्याबद्दलची अपार निष्ठा,निस्सीम भक्ती अन् त्याच्या असामान्य पराक्रमाची नोंद भारताच्या इतिहासात सुवर्णाक्षरांनी लिहिली गेली.

मध्यंतरीच्या काळात चेतकच्या शौर्य, धाडस, स्वामीनिष्ठेवर अनेक ग्रंथ लिहिले गेलेत.हीच खरी त्याच्या बलिदानाची पावती होय.एक प्राणी असून चेतक हा स्वामीनिष्ठा जपू शकतो, पण मानसिंह हा मनुष्य असूनही स्वामीनिष्ठा राखू शकला नाही, यापेक्षा मोठं दुर्दैव काय! राजगादीच्या आमिषापोटी मानसिंगने राजपुतानाचा त्याग करून अकबराचं मांडलिकत्व पत्करलं, त्या गद्दार मानसिंगच्या सोबत पंगतीत कोणीही मेवाडच्या नागरिकानं बसू नये, असा फर्मानच राणा प्रतापांनी काढला होता. गद्दार व विश्वासघातकी माणसांबद्दल राणा प्रतापांना भयंकर चिड होती, हे यावरून प्रकर्षाने दिसते. राणा प्रताप यांना स्त्रियांबद्दल नितांत आदरभाव होता.युद्धामध्ये ताब्यात घेतलेल्या शत्रूपक्षाच्या माता-भगिनींना त्यांनी सन्मानपूर्वक त्यांच्या राज्यात परत पोहोचविले. स्त्री सन्मान ह्या भारतीय परंपरेचा त्यांनी अखेरपर्यंत मान राखला. मेवाडचे महाराजा महाराणा प्रताप आणि महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांच्या उज्ज्वल कारकीर्दीत स्त्री मग ती राज्यातली असो वा परराज्यातली, तिचा यथेच्छ सन्मान व्हायचा. तिला मातेसमान दर्जा असायचा.यास्तव या द्वय महायोद्ध्यांना त्रिवार मानाचा मुजरा! जय शिवराणा!

मेवाडचे महाराणा प्रतापसिंह यांच्या शौर्यगाथेबद्दल आपल्या भारताचा शोध या कादंबरीत माजी पंतप्रधान दिवंगत पंडित जवाहरलाल नेहरू म्हणतात, राणा प्रताप हे संकटाचे स्वागत करणारे योद्धे होते. म्हणून जोपर्यंत पृथ्वीवर वीरांची पूजा होत राहील,तोपर्यंत राणा प्रतापांचं चिरस्मरण लोकांना राष्ट्रप्रेम व देशाभिमानाचे धडे देत राहील. मोडेल पण वाकणार नाही हा बाणा जीवनभर जपून, राणा प्रतापांनी अकबराचे मांडलिकत्व पत्करलंच नाही.सरदार मानसिंहसह अनेक सरदार एकापाठोपाठ महाराणा प्रताप यांच्याशी बोलणी करण्यासाठी अकबराने पाठविलेत, परंतु सर्वच जण आल्या वाटेनं खाली हात परतले. अर्ध राज्य देण्याचं आमिष अकबराने दाखवूनही महाराणा हे आपल्या ध्येयापासून तसूभरही विचलित झाले नाहीत.वास्तवात यालाच म्हणतात, खरा आत्मसन्मान अन् राष्ट्राभिमान!

महाराणा प्रताप हे एके दिवशी शिकारीला गेले असता घोड्यावरून पडून जबर जखमी झाले.त्यानंतर त्यांची प्रकृती बिघडतच गेली.परिणामीस्वरूप त्यांचे ९ जानेवारी १५९७ रोजी चावंड येथे दुःखद निधन झालं अन् भारतमाता एका राष्ट्रप्रेमी शुर योद्ध्याला कायमची मुकली.राणा प्रतापच्या निधनाची खबर जेव्हा अकबर बादशहाच्या कानी पडली.त्या क्षणीच ते ताडकन सिंहासनावरून उठले अन् निःशब्द होऊन उभे राहिले. त्या दुःखद घडीला त्यांचे डोळे पाणवले होते.अकबर बादशहा आपल्या भावना व्यक्त करताना म्हणाले, मेवाडचा राजा महाराणा प्रताप हा अपराजित राजा होता.तो आयुष्यात कोणापुढे झुकला नाही. अशा शुरवीर योद्ध्याला मी सलाम करतो. ज्याच्या शौर्यगाथेची मित्रच काय... शत्रूनेदेखील प्रशंसा केली, अशा महापराक्रमी क्रांतीसूर्य महाराणा प्रतापसिंह सिसोदिया यांना मी जयंती दिनानिमित्त त्रिवार वंदन करतो. जयराजपुताना!

लेखक - रणवीरसिंह राजपूत
मो.न.९९२०६७४२१९

# राजस्थान रॉयल्सच्या पराभवाने आरसीबीची वाढली धाकधूक

नवी दिल्ली : आयपीएल २०२४ मधील ५६ व्या सामन्यात राजस्थान रॉयल्सला दिल्ली कॅपिटल्सविरुद्ध पराभवाचा सामना करावा लागला. या पराभवाने राजस्थान संघाला फारसा फरक पडला नाही. कारण राजस्थान रॉयल्स संघ १६ गुणांसह गुणतालिकेत दुसऱ्या क्रमांकावर आहे आणि प्लेऑफसाठी पात्र ठरण्यासाठी त्यांना फक्त एका विजयाची गरज आहे. मात्र राजस्थानच्या या पराभवामुळे रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूचे मोठे नुकसान होऊ शकते. राजस्थानविरुद्धचा सामना जिंकून दिल्लीने १२ गुणांची कमाई केली, जी आरसीबीसाठी धोक्याची घंटा आहे.

राजस्थान रॉयल्सविरुद्धचा दिल्ली कॅपिटल्सचा पराभव रॉयल चॅलेंजर्स बंगळुरु संघासाठी फायदेशीर ठरू शकला असता, पण तसे झाले नाही. आता इथून कोलकाता नाईट रायडर्स, राजस्थान रॉयल्स आणि पॉइंट टेबलमध्ये तिसऱ्या क्रमांकावर असलेल्या चेन्नई सुपर किंग्जला आपापले सामने जिंकावे लागतील, ज्यामुळे आरसीबीसाठी प्लेऑफचा मार्ग मोकळा होईल.

### आरसीबीसाठी प्लेऑफचे समीकरण -

या अव्वल तीन संघांच्या विजयाव्यतिरिक्त, आरसीबीला आशा करावी लागेल की त्याच्या खालचा कोणताही संघ १४ गुणांच्या पुढे जाऊ नये, ज्यात सनरायझर्स हैदराबाद, दिल्ली कॅपिटल्स आणि लखनऊ सुपर जायंट्स यांचा समावेश आहे. हैदराबाद, दिल्ली आणि लखनऊ या तीन संघांचे प्रत्येकी १२ गुण आहेत. अशा स्थितीत तिन्ही संघांना उर्वरित सामन्यांमध्ये प्रत्येकी १-१ पेक्षा जास्त विजय नोंदवता येऊ नये. हैदराबाद आणि लखनऊला अद्याप प्रत्येकी ३ आणि दिल्लीला २ सामने खेळायचे आहेत.

या सर्व समीकरणांमध्ये रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूला उर्वरित त्यांचे तिन्ही सामने जिंकावे लागतील. आरसीबीने उरलेल्या तीनपैकी एकही सामना गमावला, तर ते प्लेऑफच्या शर्यतीतून बाहेर पडणार हे निश्चित आहे. त्यामुळे आता आरसीबी टॉप चार मध्ये स्थान मिळवून प्लेऑफमध्ये पोहोचणार की नाही हे पाहणे मनोरंजक असेल. आरसीबीने या हंगामात आतापर्यंत ११ सामने खेळले आहेत, ज्यामध्ये त्यानी ४ जिंकले आहेत आणि ७ गमावले आहेत. संघ ८ गुणांसह आणि -०.०४९ च्या निव्वळ धावगतीने सातव्या स्थानावर आहे.

## संजू सॅमसनवर बीसीसीआयकडून मॅच फीच्या ३० टक्के दंड

तिसऱ्या पंचांनी संजूला बाद घोषित केले. पण संजू काही मैदानाबाहेर जायला तयार नव्हता आणि बाद झाल्यानंतर तो पंचांशी वाद घालताना दिसला. त्यामुळे आता बीसीसीआयने पंचांच्या निर्णयाशी असहमती दाखवल्याबद्दल संजूवर मॅच फीच्या ३० टक्के दंड ठोठावला आहे.

बीसीसीआयने निवेदनात संजू सॅमसनला दंड ठोठावला असल्याचे म्हटले. या निवेदनात म्हटले आहे. राजस्थान रॉयल्सचा कर्णधार संजू सॅमसनला दिल्लीतील अरुण जेटली स्टेडियमवर दिल्ली कॅपिटल्स विरुद्ध आयपीएल २०२४ च्या ५६ व्या सामन्यादरम्यान आयपीएल आचारसंहितेचे उल्लंघन केल्याबद्दल त्याच्या मॅच फीच्या ३० टक्के दंड ठोठावण्यात आला आहे. सॅमसनने आयपीएल आचारसंहितेच्या कलम २.८ अंतर्गत लेव्हल १ चा गुन्हा केला आहे. त्याने गुन्हा मान्य केला आणि मॅच रेफरीचा निर्णयही स्वीकारला. आचारसंहितेच्या लेव्हल १ चे उल्लंघन केल्याप्रकरणी सामनाधिकारीचा निर्णय अंतिम आणि बंधनकारक असतो.

# डोळ्यांच्या आरोग्यासाठी या पदार्थांचा आहारात करा समावेश

डोळ्यांच्या समस्या ही आजच्या जगात सर्वात मोठी समस्या आहे कारण आपण नेहमी गॅझेट्समध्ये चिकटलेले असतो. याशिवाय प्रत्येक वयोगटातील डोळ्यांच्या समस्यांचा स्वतःचा समूह असतो. पल्या डोळ्यांची चांगली काळजी घेणे, आपली दृष्टी सुरक्षित ठेवण्यासाठी आणि टिकवून ठेवण्यासाठी, निरोगी जीवनशैली जगण्यासाठी देखील खूप आवश्यक आहे. दररोज ८ ते १० तास स्क्रीनवर काम केल्यामुळे डोळ्यांना पूर्ण विश्रांती मिळत नाही. या व्यतिरिक्त, पुरेसा प्रमाणात निरोगी आहार न घेतल्यामुळे, दृष्टी देखील कमकुवत होते. डोळ्यांची दृष्टी टिकवण्यासाठी कोणत्या गोष्टींचा आहारात समावेश केला जाऊ शकतो ते जाणून घेऊया.

**आवळा**

आवळा आरोग्यासाठी खूप फायदेशीर आहे, ज्यामुळे दृष्टी वाढण्यास मदत होते. आपण आवळा रिकाम्या पोटी किंवा मुरूंब्याच्या स्वरूपात खाऊ शकता. त्यात व्हिटॅमिन सी आहे जे डोळ्यांसाठी फायदेशीर आहे. आवळा केवळ डोळ्यांसाठी फायदेशीर नाही, तर आरोग्यासाठी फायदेशीर आहे. या व्यतिरिक्त, आपण ते त्वचा आणि केसांवर देखील वापरू शकता.

**बदाम**

बदाम डोळ्यांसाठी खूप चांगले आहेत. भिजवलेले बदाम रोज सकाळी रिकाम्या पोटी खावेत. ज्यामुळे व्हिटॅमिन ई, ओमेगा-३ फॅटी ॲसिड चांगले राहते. तसेच डोळ्यांची जळजळ कमी होते आणि प्रकाश वाढतो. सोबतच दिवसातून १ संत्री खाल्ल्याने व्हिटॅमिन सी देखील मिळते, ज्यामुळे डोळ्यांजवळील रक्तवाहिन्या निरोगी राहतात.

**पालक आणि बीटरूट**

पालक आहारात समाविष्ट केल्याने झेक्सॅन्थिन मिळते, जे वयामुळे प्रकाश कमी होण्यास प्रतिबंध करते. याशिवाय नाश्त्यापूर्वी बीटरूट रायता प्यायल्याने ल्युटीन मिळते, ज्यामुळे रक्ताभिसरण वाढते.

**मासे** : दृष्टी मजबूत ठेवण्यासाठी, आहारात ट्यूना, सॅल्मन, मॅकरेल, अँकोव्ही आणि ट्राउट सारखे मासे खा. हे मासे डीएचएचे नैसर्गिक स्त्रोत आहेत. मासे खाणे आपल्या आरोग्यासाठी फायदेशीर आहे.

**या गोष्टी लक्षात ठेवा**

संगणक आणि लॅपटॉपवर काम करत असताना, आपले डोळे आणि स्क्रीन दरम्यान कमीत कमी २० इंच अंतर असले पाहिजे. मोबाईल आणि लॅपटॉपचा निळा प्रकाश टाळण्यासाठी आपण हलका पिवळा प्रकाश किंवा निळा प्रकाश असणारा फिल्टर ॲप वापरू शकता.

आपण लॅपटॉपवर बऱ्याच काळासाठी काम करत असताना २०-२०-२०चे सूत्र वापरू शकता. याचा अर्थ दर तासाला २० मिनिटे ब्रेक घ्या, २० इंच अंतर ठेवा आणि २० मिनिटे नजर दुसरीकडे वळवा.

# ठाणे महापालिका क्षेत्रात २५ ठिकाणी तातुरत्या पाणपोई सुरु

## उन्हाळ्यावर मात करण्यासाठी एमसीएचआय आणि समर्थ भारत व्यासपीठ यांच्या सहकार्याने ठाणे महापालिकेचा उपक्रम

ठाणे (गणेश भोईटे) : दिवसेंदिवस वाढत असलेल्या तीव्र उन्हाळ्याचा सामना करण्यासाठी ठाणे महापालिकेने आखलेल्या कृती आराखड्यानुसार महापालिका क्षेत्रात २५ ठिकाणी एमसीएचआय आणि समर्थ भारत व्यासपीठ यांच्या सहकार्याने पाणपोई सुरू करण्यात आल्या आहेत.




नागरीकरणामुळे शहरात वाढत जाणाऱ्या उष्णतेमुळे निर्माण होणाऱ्या संकटावरील नियंत्रणासाठी ठाण्याचा सर्वंकष उष्णता उपाययोजना आराखडा तयार करण्यात आला आहे. महाराष्ट्र शासन, ठाणे महानगरपालिका व काऊन्सील ऑफ ऍनर्जी एनव्हायरोमेंट अॅण्ड वॉटर या संस्थांनी हा आराखडा एकत्रितपणे तयार केलेला आहे. उष्णतेच्या लाटेच्या सामना करण्यासाठी ठाणे महानगरपालिका सजग असून परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन आयुक्त सौरभ राव यांच्या आदेशानुसार महापालिका क्षेत्रात मोठ्या प्रमाणात जनजागृतीही करण्यात येत आहे.

आयुक्त सौरभ राव यांनी दिलेल्या निर्देशानुसार महापालिका क्षेत्रात पाणपोई सुरू करण्यात आल्या आहेत. ठाणे महापालिकेने केलेल्या आवाहनानुसार, सीएसआरच्या माध्यमातून पाणपोई सुविधा उपलब्ध केली गेली आहे. या २५ ठिकाणी पाण्याचे मोठे माठ, ग्लास ठेवण्यात आले आहेत. तेथे दररोज पिण्याचे शुद्ध पाणी भरण्याची व्यवस्था संबंधित संस्था करत आहेत, माहिती मुख्य पर्यावरण अधिकारी मनिषा प्रधान यांनी दिली.

ठाणे स्टेशन, कोपरी पूल, आईस फॅक्टरी, जवाहरबाग, आशर आयटी पार्क, किसननगर शाळा, अंबिका नगर नं. ३, पडवळ नगर, हाजुरी गाव, पासपोर्ट ऑफिस, तीन हात नाका, कोलशेत रोड नाका, बाळकूम नाका, माजीवडा नाका, कळवा स्टेशन, ९० फूट रस्ता-खारेगाव, कळवा नाका-दत्त मंदिर, कौसा तलाव, वफा पार्क, अमृत नगर, लोकमान्य डेपो, राबोडी, कोर्ट नाका, वर्तकनगर नाका, शास्त्री नगर नाका अशा २५ ठिकाणी पाणपोई सुरू करण्यात आली आहे.

## मतदानाच्या जागृतीसाठी ठाण्यात मिनी मॅरेथॉन

**ठाणे (मेधा भोईटे) : येत्या २० मे रोजी होऊ घातलेल्या लोकसभा निवडणुकीत जास्तीत जास्त मतदारांनी मतदान करावे याबद्दल जागृती करण्यासाठी ठाण्यात, शनिवार, ११ मे रोजी सकाळी मिनी मॅरेथॉनचे आयोजन करण्यात आले आहे. ठाणे महापालिका, जिल्हाधिकारी कार्यालय, ठाणे जिल्हा अॅथलेटिक असोसिएशन आणि ठाणे सिटीझन्स फाऊंडेशन यांचा हा संयुक्त उपक्रम असून जास्तीत जास्त धावपटूंनी या मॅरेथॉनमध्ये सहभागी व्हावे, असे आवाहन ठाणे महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी केले आहे.**

**शनिवार, ११ मे रोजी स. ६.३० वा. काशिनाथ घाणेकर नाट्यगृहापासून आरंभ**

सार्वत्रिक निवडणुकीत मतदानाची टक्केवारी वाढावी यासाठी ठाणे महापालिकेतर्फे 'स्वीप'अंतर्गत विविध उपक्रम हाती घेतले आहेत. रविवारला जोडून मतदानाची सुटी आली असली तरी नागरिकांनी मतदान करणे चूकवू नये यासाठी वारंवार जागृती केली जात आहे. या मतदानाची आठवण करून देण्यासाठी 'धावा आणि मतदान करा' असा संदेश देणारी मिनी मॅरेथॉन शनिवार, ११ मे रोजी आयोजित करण्यात आली आहे. त्यात नागरिकांनी मोठ्या प्रमाणावर सहभागी व्हावे आणि मतदानाचा संदेश घरोघरी पोहोचवावा, असे आवाहन आयुक्त सौरभ राव यांनी केले आहे.

शनिवारी, स. ६.३० वा. डॉ. काशिनाथ घाणेकर नाट्यगृहाच्या समोर या मिनी मॅरेथॉनला जिल्हाधिकारी अशोक शिनगारे आणि महापालिका आयुक्त सौरभ राव हे हिरवा झेंडा दाखवतील. या मॅरेथॉनमध्ये १२ वर्षावरील, १५ वर्षाखालील, १८ वर्षाखालील, १८ वर्षापेक्षा मोठ, तृतीयपंथीय असे गट करण्यात आले आहेत. मॅरेथॉनचा पारितोषिक वितरण समारंभ घाणेकर सभागृहात होणार आहे.

## अमृत अभियानांतर्गत पाणीपुरवठा कामांची आयुक्तांची पहाणी

पनवेल : केंद्र शासनाच्या अमृत २.० अभियान अंतर्गत पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील २९ गावाकरिता पाणी पुरवठा योजनेस मंजुरी प्राप्त आहे. या योजने अंतर्गत सद्यस्थितीत ११ ठिकाणी जलकुंभाची कामे सुरु आहेत व ५७ किमी लांबीची जलवाहिनी अंथरण्याचे काम पूर्ण झालेले आहे. नुकतीच या कामाची पहाणी आयुक्त प्रशांत रसाळ यांनी केली. यावेळी उपायुक्त कैलास गावडे, उपअभियंता विलास चव्हाण, सल्लागार प्रतिनिधी व ठेकेदार उपस्थित होते.




यावेळी आयुक्तांनी पावसाळ्यापूर्वी सुरु असलेली सर्व जलकुंभाची कामे सुरक्षित पातळीपर्यंत पूर्ण करण्याच्या सुचना ठेकेदारांना दिल्या. तसेच जलवाहिन्या टाकण्याकरिता खोदण्यात आलेल्या रस्त्यांची कामे २५ मे पर्यंत पूर्ण करण्याच्या सूचना ठेकेदारांना देण्यात आल्या.

अमृत २.० अभियान अंतर्गत पनवेल महापालिकेने २९ गावाच्या पाणी पुरवठा योजनेचा प्रस्ताव केंद्र शासनाकडे मांडला होता. त्यास मंजूरी मिळाली असून, या अंतर्गत एकुण ३१ पाण्याच्या टाक्या व १७९ किमी लांबीची वितरण व्यवस्था करण्याचे काम महापालिकेने हाती घेतले आहे. या योजनेमुळे महापालिका कार्यक्षेत्रातील २९ गावांना मुबलक पाणी पुरवठा करणे सोयीचे होणार आहे.

## नवी मुंबईत ८० दिवस पुरेल एवढा पाणीसाठा

नवी मुंबई : मुंबई, ठाणेसह आजूबाजूच्या शहरांवर पाणीकपातीचे संकट असताना दुसरीकडे नवी मुंबईला पाणीपुरवठा करणाऱ्या धरणात मात्र पुढील ८० दिवस पुरेल एवढा जलसाठा आहे. परंतू नागरिकांनी पाण्याचा अपव्यय टाळावा व पाणी जपून वापरावे असे आवाहन महापालिकेने केले आहे.

राज्यातील विविध धरणांत झपाट्याने पाणीसाठा कमी होत असून मुंबईला पाणीपुरवठा करणाऱ्या धरणांत फक्त ४० टक्क्यांपेक्षा कमी जलसाठा शिल्लक असताना नवी मुंबईला पाणीपुरवठा करणाऱ्या मोरबे धरणात सध्या ३६.६२ टक्के जलसाठा आहे. नवी मुंबईकरांना पुढील ८० दिवस पुरेल इतका जलसाठा धरणात आहे.

राज्याच्या विविध भागांत तसेच मुंबई शहरावरही पाणीकपातीचे संकट असताना नवी मुंबईकरांना मात्र २६ जुलैपर्यंत सुरळीत पाणीपुरवठा करता येईल एवढा पाणीसाठा शिल्लक आहे. तरीदेखील नवी मुंबईकरांनी पाण्याचा वापर जपून करायला हवा.

## २४४ किलो प्रतिबंधात्मक प्लास्टिक जप्त आणि ५० हजार दंड

नवी मुंबई : नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रात स्वच्छतेकडे विशेष लक्ष देण्याप्रमाणेच पर्यावरणाला हानीकारक असणाऱ्या प्लास्टिक प्रतिबंधाकडेही विशेष लक्ष देण्याचे निर्देश आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी आढावा बैठकीत दिले आहेत. या अनुषंगाने एकल वापर होणाऱ्या प्लास्टिकचा वापर पूर्णपणे थांबावा याकरिता जनजागृती करण्यासोबतच प्लास्टिक प्रतिबंधात्मक शोध मोहीमा सर्वच विभागांमध्ये राबविल्या जात आहेत.

यामध्ये परिमंडळ २ च्या प्लास्टिक विरोधी विशेष भरारी पथकाने उपआयुक्त चंद्रकांत तायडे यांच्या नियंत्रणाखाली ऐरोली सेक्टर ८ ए येथे प्रतिबंधात्मक प्लास्टिक वितरण करणा-या एका टेम्पोवर धाड टाकत साधारणत: २२५ किलो प्रतिबंधात्मक प्लास्टिक साठा जप्त केला तसेच संबंधितांकडून ५ हजार दंडात्मक रक्कम वसूल करण्यात आली. या कारवाईत डी.आर.पाटील, वसंत बाविस्कर, महेश पाटील, अनिकेत म्हात्रे या महापालिका कर्मचाऱ्यांनी चांगले काम केले.

अशाच प्रकारे १ मे पासून आठवड्याभरात बेलापूर विभागात ३ व्यावसायिक / आस्थापनांवर कारवाई करीत १५ हजार दंडात्मक रक्कम व १० किलो प्रतिबंधित प्लास्टिक जप्त करण्यात आले. वाशी विभागात एका





व्यावसायिकावर कारवाई करीत ५ हजार दंडात्मक रक्कम व १ किलो एकल वापर प्लास्टिकची जप्ती केली. कोपरखैरणे विभागातही एका दुकानदाराकडून ५ हजार दंड वसूली व दीड किलो प्लास्टिक जप्ती करण्यात आली. परिमंडळ १ च्या प्लास्टिकविरोधी भरारी पथकाने एका व्यावसायिकावरील कारवाईत ५ हजार दंडात्मक रक्कम वसूली आणि १ किलो एकल वापर प्लास्टिकचा साठा जप्त केला. तसेच परिमंडळ २ च्या भरारी पथकाने ४ व्यावसायिकांवर कारवाई करीत २० हजार दंड वसूली आणि २३० किलो ६०० ग्रॅम इतके प्रतिबंधात्मक प्लास्टिक जप्त केले आहे. अशाप्रकारे नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रात आठवड्याभरात १० दुकाने / आस्थापना यांच्याकडून ५० हजार इतकी दंडात्मक रक्कम वसूली तसेच २४४ किलो १०० ग्रॅम प्रतिबंधात्मक प्लास्टिक जप्त करण्यात आलेले आहे.

यापुढील काळातही नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने ही प्लास्टिक वापर प्रतिबंधात्मक कारवाई अशीच सुरू राहणार असून नागरिकांनीही कापडी पिशव्यांच्या वापर सुरू करून आपल्या रोजच्या जगण्यातून पर्यावरणाला व मानवी जीवनाला धोका पोहचविणाऱ्या एकल वापर प्लास्टिकचा वापर पूर्णपणे थांबवावा असे आवाहन करण्यात येत आहे.

## नवी मुंबई महानगरपालिका पथनाट्यांव्दारे लोकसभा निवडणुकीत मतदान करण्याचे आवाहन

नवी मुंबई : जनजागृतीच्या विविध माध्यमांमध्ये पथनाट्य हे अत्यंत प्रभावी माध्यम असून २० मे रोजी होणाऱ्या २५ ठाणे लोकसभा निवडणूकीत जास्तीत जास्त नागरिकांनी मतदान करावे या अनुषंगाने स्वीप कार्यक्रमांतर्गत नवी मुंबई महानगरापालिकेच्या वतीने आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली राबविल्या जात असलेल्या विविध उपक्रमांमध्ये पथनाट्याचाही प्रभावी वापर करण्यात येत आहे.



या पथनाट्यांतील कलावंत समुह महापालिका क्षेत्रात संध्याकाळच्या सत्रात गर्दीच्या ठिकाणी जाऊन चौकाचौकात लोकशाहीचा जागर करीत निवडणूकीत मतदान करण्याचे आवाहन करीत आहेत. मनोरंजक पध्दतीने सादर होणारी ही पथनाट्ये मतदान करण्याचे महत्व हसतखेळत पटवून देत आहेत. हा लोकशाहीचा उत्सव आपण सर्वांनी मिळून साजरा करावयाचा असून मतदान करून आपल्याला संविधानाने दिलेला मतदानाचा अधिकार बजावयाचा आहे हे लोकांना पथनाट्याव्दारे पटवून दिले जात आहे.

वाशी विभागात रेल्वे स्टेशन परिसर, मिनी सी शोअर सेक्टर ९, सेक्टर ९ मार्केट, सेक्टर १५ मार्केट, सेक्टर १० चौक तसेच नेरूळ विभागात रेल्वे स्टेशन पश्चिम बाजू आणि पूर्व बाजू, सेक्टर १० पूर्व, नेरूळ गाव, नेरूळ सेक्टर २० चौक अशा विविध ठिकाणी झालेली पथनाट्ये बघण्यासाठी नागरिकांनी मोठ्या प्रमाणात गर्दी केली होती. पथनाट्ये सादर केल्यानंतर नागरिकांनी टाळ्यांची दाद देत कलावंतांच्या सादरीकरणाचे कौतुक केले. यावेळी उपस्थित प्रेक्षक नागरिकांनी डाव्या हाताची तर्जनी उंचावत सामुहिक सेल्फी काढून आपण मतदान करणार असल्याचे दर्शविले.

नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रात बेलापूर ते दिघा अशा आठही विभागांमध्ये गर्दीच्या ठिकाणी पथनाट्ये सादर करून मतदार जनजागृती केली जात असल्याची माहिती नवी मुंबई महानगरपालिका निवडणूक उपआयुक्त शरद पवार यांनी दिली आहे.

## भिवंडी लोकसभा मतदारसंघात दि. ९ मे पासून गृह मतदानाला सुरुवात : निवडणूक निर्णय अधिकारी संजय जाधव

भिवंडी : २३, भिवंडी लोकसभा मतदार संघ अंतर्गत गृह मतदानाला उद्यापासून दिनांक ९ मे पासून सुरुवात होणार आहे. भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार ८५ वर्ष वयापेक्षा जास्त वय असलेल्या तसेच दिव्यांग, कोविड बाधित मतदारांना त्यांची इच्छा असल्यास त्यांच्या घरी टप्पाली मतदान, गृह मतदान करण्याची सोय उपलब्ध करून देण्यात आली आहे. त्यानुसार अशा मतदारांना टपाली मतदानाचे नमुना १२ ड मधील अर्ज उपलब्ध करून देण्यात आलेले होते. त्यापैकी प्राप्त झालेल्या निर्णय घेण्यात आलेला असून मंजूर अर्जाची यादी नुसार उपरोक्त खालील विधानसभा निहाय मतदार संघाद्वारे ८५ वर्षापेक्षा जास्त असलेल्या व दिव्यांग असलेल्या मतदारांच्या मतदान घेण्यात येणार आहे यामध्ये १३४ भिवंडी ग्रामीण मध्ये दिनांक ९ व १० मे व रोजी ८५ वर्षे पेक्षा जास्त असलेले ८० मतदार, व दिव्यांग मतदार ०९, १३५ शहापूर मध्ये दिनांक ९ व १४ रोजी ८५ वर्षा वरील ६२ तर दिव्यांग असलेल्या ८, १३६ भिवंडी मध्ये दिनांक १० व १४ मे रोजी ८५ वर्षावरील १७ आणि दिव्यांग असलेले एकूण ३ मतदार, १३७ भिवंडी पूर्व १० व १४ मे रोजी मतदान घेण्यात येणार आहे यामध्ये ८५ वर्षांमधील १४ आणि दिव्यांग असलेल्या असे ०३ एकूण १७ मतदारांचा गृह मतदानाद्वारे मतदान घेण्यात येणार आहे, १३८ कल्याण पश्चिम मध्ये दिनांक ११ व १२ मे रोजी दरम्यान ८५ वर्षातील ३५ आणि दिव्यांग असलेले ४ मतदार यांचे मतदान घेण्यात येणार आहे तर १३९ मुरबाड मध्ये दिनांक १० मे व १५ या दोन दिवसात ८५ वर्षापेक्षा जास्त ३४ आणि दिव्यांग असे २, असे एकूण संपूर्ण लोकसभा मतदार क्षेत्रात हे ८५ वर्षांवरील एकूण २४२ तर २९ मतदार हे दिव्यांग मतदार म्हणून आहेत. या सर्व मतदारांच्या घरी जाऊन मतदान केंद्र उभारून मतदान घेण्यात येणार आहेत. याकरिता मतदान केंद्राध्यक्ष व मतदान अधिकारी यांच्या देखील नेमणुका करण्यात आल्या आहेत. याकरिता उमेदवार किंवा त्यांचे प्रतिनिधी प्रत्यक्ष मतदानाच्या ठिकाणी उपस्थित राहू शकतात याबाबत सर्व उमेदवार यांना उपस्थित राहण्याबाबत पत्र देखील देण्यात आली आहेत.

या गृह भेटीसाठी १३४ भिवंडी ग्रामीणमध्ये नऊ पथक, १३५ शहापूर १० पथक, भिवंडी पश्चिम मध्ये २ पथक, भिवंडी पूर्वमध्ये २ पथक, १३८ कल्याण करिता २ पथक १३९ मुरबाड करिता ०५ पथक अशी एकूण ३२ पथक तयार करण्यात आली आहेत, या कामाकरीता केंद्रीय निवडणूक आयोगाने ४० सूक्ष्म निरीक्षक यांची देखील नेमणूक केली आहे. या सर्व मतदानाचे व्हिडिओ चित्रीकरण देखील करण्यात येणार आहे. गृह मतदानाकरता येणारे कर्मचारी हे त्यांचे ओळखपत्र लावून येतील त्यांना पूर्णपणे सहकार्य करण्याचे आवाहन निवडणूक निर्णय अधिकारी संजय जाधव यांनी केले आहे. दिनांक ९ ते १५ मे दरम्यान गृह मतदानाची प्रक्रिया पार पाडण्यात येणार असल्याची माहिती निवडणूक निर्णय अधिकारी संजय जाधव यांनी दिली.

## ठाणे लोकसभेचे महायुती-शिवसेनेचे उमेदवार नरेश म्हस्के यांचे रुस्तमजी आजियानो सोसायटीत फटाक्यांच्या आतषबाजीने स्वागत











**युवा नेते मुन्नाभाई यांच्या रॉयल कन्स्ट्रक्शन ग्रो कंपनीच्या कार्यालयाचे लताताई शिंदे यांच्याहस्ते उद्घाटन**

ठाणे : ठाणे लोकसभा महायुतीचे शिवसेनेचे अधिकृत उमेदवार नरेश गणपत म्हस्के यांनी प्रचारार्थ ठाणे(प.)येथील रुस्तमजी आजियानो ए बी सी हाऊसिंग सोसायटीतल्या रहिवाशींची भेट घेतली.अन् तुमच्या येथील प्रलंबित रस्त्याचा प्रश्न प्राधान्याने सोडविला जाईल, असे आश्वासन दिले. याप्रसंगी सलताताई एकनाथजी शिंदे,आमदार रविंद्र फाटक, माजी महापौर मीनाक्षीताई शिंदे, शिवसेनेचे राज्य युवा प्रमुख सर्वेश सरनाईक, शिवसेनेचे प्रवक्ते राहुल लोंढे, युवा नेते नितीन लांडगे, वृंदावन विभाग प्रमुख अमित जयस्वाल, राबोडीचे शाखा प्रमुख अनिल शिंदे आदी मान्यवर उपस्थित होते.

प्रारंभी सोसायटीचे चेअरमन सुधाकर माळी, सचिव बाळासाहेब निंबाळकर, मुन्ना भाई व अन्य पदाधिकाऱ्यांनी प्रमुख पाहुण्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. अन् शेवटी सोसायटीचे चेअरमन सुधाकर माळी यांनी प्रमुख पाहुण्यांचे कृतज्ञतापूर्वक आभार मानले. सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राज्य प्रसिद्धी प्रमुख,शिवसेना वैद्यकीय मदत कक्ष/ डॉ. श्रीकांत शिंदे फाउंडेशन (पत्रकार) रणवीर राजपूत यांनी केले.

दरम्यान शिवसेना युवा नेते मुन्नाभाई यांच्या रुस्तमजी आजियानी येथील रॉयल कन्स्ट्रक्शन ग्रो कंपनीच्या कार्यालयाचे लताताई एकनाथ शिंदे यांच्याहस्ते रिबीन कापून उद्घाटन करण्यात आले. याप्रसंगी मुन्नाभाई यांनी सौ.लताताई शिंदे यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. याप्रसंगी रुसत्मजी आजियानो अन् आसपासच्या सोसायटींचे रहिवाशी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

'महाराष्ट्र सम्राट' हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक चंद्रकांत शंकरराव भोईटे यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अँड पब्लिकेशन्स प्रायव्हेट लिमिटेड, प्लॉट नंबर – डब्लू २३० टी.टी.सी. इंडस्ट्रियल एरिया, कोपर खैरणे, एम.आय.डी.सी., ठाणे बेलापूर रोड, नवी मुंबई – ४००७१० येथे छापून ३०२, हार्मोनी टॉवर, भारत ज्वेलर्स समोर, नेताजी सुभाष चंद्र रोड, कोर्ट नाका, ठाणे पश्चिम – ४००६०१ (महाराष्ट्र ) येथे प्रकाशित केले. संपादक – चंद्रकांत शंकरराव भोईटे ■ RNI - MAHMAR/2012/44140 ■ मो. नं. : +९१-९१६७९५७७७१